श्रीगुरुदत्तप्रसन्न.

संगीत

चंद्रसेन–मोहना

नाटक.

अंक १ ते ५.

हें

पुस्तक

बाळकृष्ण विठ्ठल धामणस्कर

यांनीं रचिलें.

तें

सावळाराम विठ्ठल धामणस्कर

यांनीं

मुंबईंत

"गणपत कृष्णाजी" छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

आंवृत्ति १ ली.

सन १९०६

किंमत ६ आणे.

॥ अर्पणपत्र ॥

डा० हरी रामजी पवार,

मुकाम विजयदुर्ग.

यांस

हें पुस्तक.

त्यांची परोपकार बुद्धि, उद्योग शीलता, विद्या-
भीरुचि सौजन्य इ० थोर गुणावर लुब्ध
होऊन स्नेह भावास्तव प्रेमपुरःसर
अर्पण केलें असे.

सावळाराम विठल धामणस्कर

पुस्तक प्रकाशक.

प्रस्तावना.

अलीकडे संगीत नाटकासंबंधानें सर्व लोकसमूहाची अभिरुचि बरीच वाढत चालली आहे, तसतशीं अनेक नवीन नवीन संगीत नाटकेंहि लोकसमाजापुढें येत आहेत. पुष्कळ वर्षांपासून आमचीं कामसेन-रसिका, वीरसेन-मंजरी, भुवनसुंदरी, रत्नावली, अजितसिंह-कमला, स्नेहपाल, अल्लाउद्दीन, इ. नाटकें लोकादरास पात्र झालेलीं आहेत, हें त्यांच्या पुनरावृत्ति वरचेवर काढण्याचा सुयोग येतो, यावरून उघडच आहे.

सुमारें दोन तीन वर्षांपूर्वी आमच्या वडील बंधूंनीं प्रस्तुत पुस्तक तयार केलेलें होतें, परंतु अनेक व्यावहारिक अडचणीं-मुळें तें छापून प्रसिद्ध करण्याची सुसंधि आली नाहीं. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या आमच्या इतर पुस्तकांप्रमाणेंच हेंहि पुस्तक मनोरंजनाच्या व समाजावर होणाऱ्या परिणामाच्या दृष्टीनें उपयोगी पडेल, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. या नाटकांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या स्वभावाचें चित्र पाहिलें असतां व्यवहारामध्यें मनुष्यावर कसकसे अचानक प्रसंग येतात, दुष्ट लोकांचीं कपट कारस्थानें कशीं असतात व शेवटीं सज्जनांचा उत्कर्ष कसकसा होत जातो याची उत्तम ओळख पटण्यासारखी आहे.

हें पुस्तक तयार होत असतां, आमचे मित्र रा. रा. शिवराम वामन जोशी (सन्मार्गोपदेश पुस्तकाचे कर्ते) यांनीं कित्येक सूचना केल्याबद्दल आम्ही यांचे फार आभार मानतों.

प्रकाशक.

नाटकांतील पात्रांची नांवें.

सूत्रधार ....नाटकाचार्य.
नटी ....त्याची स्त्री.
धर्मदक्ष ....प्रधान.
धैर्यशील ....प्रधान.
वीरवर्मा ....चंद्रसेनाचा बाप.
चंद्रसेन ....नायक.
मोहना ....नायिका.
पद्मावती ....मोहनेची आई.
वीरकांत ....मोहनेचा बाप.
कामपालराजा ....एकदुष्टबुद्धिराजा.
भामिनी..........................कामपालाची स्त्री.
प्रबुद्धि ....कामपालराजाचा प्रधान.
शूरसेन ....चंद्रसेनाचा मित्र.
धनदास ....कामपालाचा सेनापति.

या शिवाय दास दासी साधु सैन्य जमादार आणि शिपाई वगैरे.

॥ श्रीगजानन प्रसन्न. ॥

संगीत.

चंद्रसेन-मोहना नाटक.

अंक १ ला.

मंगला चरण.

पद-राग खमाज, ताल-धुमाळी. चाल-जय श्रीरमणा भवभयहरणा.

श्रीनटनायकें भवभयहारक पार्वतीश आधीं नमुनी ॥
मंगलदायक विघ्नविनाशक श्रीगणनाथातें स्मरुनी ॥
॥ ध्रु० ॥ कालिदासभवभूती प्रभृति नाट्यकवींना वंदितसें ॥ दुष्करकामीं सद्गुरुसेवा धीर मनाला देत असे ॥ अल्पमती मी कार्यभार हा शिरीं घेतसें जाणोनी ॥ ईशकृपेनें गुरुप्रसादें सफलचि होवो रसिकजनीं ॥ १ ॥

सूत्रधार—(गुलाल पुष्पें उधळित उधळित)

पद. राग अरबी, ताल—धुमाळी चाल—(सांब सुराभरणा.)
सौख्य तुह्मां देवो ॥ दुःखें विलया हरि नेवो ॥ ध्रु० ॥
दैत्यारी भवभयनाशक जो ॥ रक्षितसे चर अचर सर्वदा ॥
सौख्य० ॥ योगरूप धरुनी ॥ शयनीं ॥ क्षिरसागरवासी ॥
निर्गुण सुखमय तो ॥ निरंतर ॥ रुचिरकांति शोभे ॥
विठलसुत बलवंत कवि तें सुख शांति होवो ॥
सौख्य०॥ १ ॥

अहाहा, केवढें आश्चर्य ! धन्य धन्य त्या परमात्म्याची कीं, ज्याच्या कृपाकटाक्षानें सकल जीवसृष्टीचें निरंतर क-

ल्याण होतें. त्या अतुल सामर्थ्यवान् जगन्नियंत्याच्या अप्रतिम योजनेनें या जगद्रूप विस्तीर्ण रंगभूमीला कितीबरें उज्वल शोभा आली आहे ? खरोखर, संसार हें एक नाटक आहे; व परमेश्वर या संसार नाटकाचा सूत्रधार आहे ! (आपल्याशीं विस्मयानें) पहा, जगदीश्वराच्या यशोवर्णनांतच गुंग होऊन मी येथें जमलेल्या प्रेक्षक जनांचें स्वागत करण्यास कसा विसरलों तो ! (प्रेक्षकांकडे पाहून) विद्वज्जन हो.

पद. (चाल–पुष्पांजलि या हरिच्या) त्रिताल.

उत्तेजन बहु येइ मनाला ॥ अवगुणगुण जरि
विशदचि केला ॥ ध्रु० ॥ गुणदोषांचें विवरण
करुनी ॥ सन्मार्गाची दिशा दावुनी ॥ निजज्ञा-
नाचा लाभ बुधजनीं इतरां देणें युक्त तयांला ॥
उत्तेजन० ॥ १ ॥

बरें पण, छायेप्रमाणें सदोदित अनुकूलतेनें वागणारी, प्रत्येक कामांत मनोभावानें साहाय्य करणारी माझी प्रिया, अजून इकडे कशी आली नाहीं बरें ? (पडद्याकडे पाहून) प्रिये, नेपथ्यकार्य समाप्त झालें असेल, तर इकडे ये पाहूं.

नटी–(पडद्याबाहेर येऊन)

पद. (चाल–दैवयोग दुर्विपाक.)

प्राणनाथ, मोद बहुत वाटतो मना ॥ देखुनियां
झालीसे सफल कामना ॥ ध्रु० ॥ विद्वन्मणिमंडित
ही रम्य भूमिका ॥ अवलोकुनि हर्षमग्न मन न
होइ कां ॥ श्रवण पहा लुब्ध होति गान सेवना ॥
सौख्यभरें स्तिमितताहि येइ लोचनां ॥ प्राण० ॥ १ ॥

सूत्रधार—(उल्हासानें) प्रिये, रसिक वृंदाविषयीं अनु-

रागयुक्त असें हें तुझ्या प्रमुदित चित्तवृत्तीचें हुबेहुब चित्र कोणाला संतोष देणार नाहीं बरें? खरोखर, धन्य धन्य ते पुरुषवर्य कीं ज्यांस अशी चतुर व पतिमतानुकूल भार्या प्राप्त होते. असो; प्रिये,

साकी.

रुचिर मनोहर बहु कृति बघुनी हृष्टचित्त जो झाला ।।
रसिकवृंद हा उल्हासभरें येथ असे जमलेला ।। तुष्ट
करूं त्याला दावुनी, नूतन बलवत कृतिला।। १ ।।

नटी—प्राणनाथ, अनेक कविकृत कर्णमधुर कृतींनीं बहुत वेळां संतुष्ट झालेल्या, रसिक विद्वज्जनांचें मन आनंदीत करावयाचें आहे; ह्मणून ह्मणतें कीं, आपली सर्व तयारी तशा-प्रकारची झाली आहेना? कारण,

पद. (राग—कालिंगडा; त्रिताल.)

कविवर थोर किती ।। ध्रु० ।। निजवाग्वधुच्या
विविध विलासें ।। जनमन आकळिती ।। नाटयक-
लेच्या दृढन्यासंगें निजवय वेंचविती ।।कवि०।।१।।
प्रेक्षकगण हा रसिकचि भासे ।। गायन लुब्ध मती ।।
यास्तव संमत होईल कैशी नूतन काव्यकृती ।।
।। कविवर० ।। २ ।।

सूत्रधार—शाबास प्रिये, मार्मिक शंका काढली परंतु असें पहा:—

पद—(चाल—सद्दर.)

भूवरि कधितरि होतिल का हे ।। अवघे जन नृपती ।।
कोकिल येई निजगुणयोगें ।। पक्षिगणीं पुढती ।।
नूतन ह्मणुनी त्याज्य न होई ।। खचिताचि काव्यकृती।।
गुणवत्ता ही जशी जयाची ।। होय तशी महती ।। १ ।।

नटी—प्राणनाथ, आपलं भाषण अगदीं खरं आहे. पण आणखी, हल्लींची लोकाभिरुचि नको का थोडी पहायला? कारण,

दिंडी.

विविध रस लोकीं विविध चित्तवृत्ति ॥ एक ज्याला
प्रिय, तेंचि दुज्या खंती ॥ सकल जनसंमत होय
कृती कैशी ॥ पात्र होईल जी बहुत आदरासी ॥ १ ॥

सूत्रधार—हा वेडे, तुझ्याच बोलण्यावरून हें सिद्ध होत नाहीं काय कीं,

पद. (चाल—रामारे मैंतो.) त्रिताल.

जनांची भिन्न रुची असते ॥ ध्रु० ॥ जें प्रिय एका
अप्रिय तेंची ॥ वाटे इतरां; रीति जगाची ॥ अशक्य
संमति सकल जनांची ॥ जणिं ही रीताची दिसते ॥
जनांची० ॥ १ ॥

आणखी असें पहा कीं, कोणाहि मनुष्याचें ज्ञान पूर्णावस्थेला प्राप्त होणें कधीं शक्य नाहीं. पूर्णज्ञानी केवळ एक ईश्वर आहे. असो; प्रिये, आतां शिष्टसंप्रदायास अनुसरून मधुरस्वरानें थोडेसें गायन करून प्रेक्षक जनांचें क्षणभर मनरंजन कर.

नटी—प्राणनाथ, आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास ही दासी सर्वदा तयारच आहे.

पद. (राग—झिंजोटी, ताल धुमाळी.)

किति सुंदर तरि दिसते शोभा रंगभूमिची मनरमणी
ही ॥ प्रेक्षकगण हा बहु उल्हासें दंग मानसीं होउनि
जाई ॥ ध्रु० ॥ पुष्प भरानें जेंवि शोभते लता मालती
रम्य वनींची ॥ तेंवि दिसतसे रंगभूमि ही सुहास्य वदना
मजसाची ॥ विविधवर्णयुक्ता कीं मानस कमलपंक्तिमय

वाटतसे ही ॥ चित्रासम जणूं तटस्थ राहे भास मनाला ऐसा होई ! ॥ किति० ॥ १ ॥

सूत्रधार—शाबास प्रिये, तुझ्या ह्या मनोहर गायनकौशल्यानें प्रेक्षकगण पहा कसा अगदीं तल्लीन होऊन गेला आहे. असो; आतां,

साकी.

नूतन विरचित बलवत कृति सखये रुचिर असे अवलोकीं ॥ 'चंद्रसेन मोहना' तियेला प्रकट करूं या लोकीं ॥ साह्य तुवां व्हावें ॥ प्रयोगीं साधन पुरवावें ! ॥ १ ॥

(जातात.)

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळ—राजरस्ता.

(धर्मदक्ष व धैर्यशील प्रवेश करितात.)

धर्मदक्ष—धैर्यशीला, केवढें भाग्य या नगराचें ! आमच्या महाराजांसारखा सात्विक, प्रेमळ व प्रजापालनीं दक्ष असा राजा पृथ्वीतलावर क्वचित्च असेल. महाराजांची गुणग्राहकता, कर्तव्यजागरूकता व स्वधर्मपराणता हीं अगदी वर्णनीय आहेत.

धैर्यशील—खरें आहे प्रधानजी; पहा, आपल्या राज्याला बाह्यशत्रूपासून वारंवार त्रास भोगावा लागला आहे. पण महाराजांच्या मनाची शांति कशी ती तिळमात्र ढळली नाहीं.

उलट शत्रूंच्या नाशा विषयीं त्याची उत्साहशक्ति शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें वृद्धिंगत होत गेली आहे.

धर्मदक्ष—एकंदरीनें महाराजांच्या कारकीर्दींत सर्व प्रजा अगदीं सतुंष्ट झाली आहे. परंतु, आतां लौकरच राज्यस्थितीमध्यें फरक पडावयाचा आहे. महाराजांचा आतां वृद्धापकाळ झाल्यामुळें सर्व राज्यकारभार धाकट्या महाराजांवर सोंपवून वानप्रस्थाश्रमाचें सेवन करण्याकरितां ते अरण्यांत जाणार आहेत.

धैर्यशील–प्रधानजी, थोरल्या महाराजांचें राज्यकारभारापासून विमोचन व धाकट्या महाराजांचा नूतन राज्याधिकार समारंभ ह्या दोन गोष्टी एकाच वेळीं घडत असल्यामुळें त्या अशा वाटतात कीं,

साकी.

सुखवुनि सकलां निजप्रतापें दिनकर अस्ता जाई ॥
पूर्णचंद्र तें आल्हादभरें उदया जैसा येई ॥ भासे अद्भुतसा ! ॥ सांप्रत योग पहा ! तैसा ॥ १ ॥

धर्मदक्ष—धैर्यशीला तूं ह्मटल्याप्रमाणें योग घडून येणार तर खराच आजचा केवढा धन्य दिवस ! आमच्या सद्गुणी व परमशूर धाकट्या महाराजांचें अतुलबुद्धि सामर्थ्य आजपासून प्रत्यक्ष अनुभवास येणार.

धैर्यशीला–महाराजांच्या इच्छेप्रमाणें सर्व समारंभ उत्कृष्ट रीतीनें साजरा होवो, आणि धाकट्या महाराजांच्या कर्तृत्वानें सर्व प्रजा संतुष्ट राहो, हीच ईश्वरापाशीं अनन्यभावानें प्रार्थना आहे.

धर्मदक्ष—धैर्यशील, आपल्या महाराजांचें थोर भाग्य ह्मणूनच हा असा उत्तम योग घडून येत आहे. कारण,

पद. (राग—असावरी; चाल—राम स्मरावा.)

धन्य तेचि नृपती ॥ भूवरी धन्य ० ॥ ध्रु० ॥ पराक्र-
मानें वंद्य होउनी, वरिती धवल सुकीर्ति ॥ भूवरी० ॥ १
धर्मपरायण सत्यनिष्ठ ही कर्तव्या अनुसरति ॥
भूवरी ० ॥ २ ॥ इहपरलोकीं सौख्य भोगुनी, सेविति
बहु चिरशांति ॥ भूवरी ० ॥ ३ ॥

धैर्यशील—प्रधानजी, खरोखर, ऐहिक सुखांचा उत्तम उपभोग घेऊन परमार्थिक हित करणे हेंच जन्माचें सार्थक होय

धर्मदक्ष—खरेंच धैर्यशीला, नाहीं तर मनुष्य जन्मास आला काय आणि गेला काय ? त्यांत कांहींच विशेष नाहीं. (इकडे तिकडे पाहून) धैर्यशीला, समारंभाचा समय होत आला; तर चला महाराजांच्या तिकडेच जाऊं.

धैर्यशील—ठीक आहे समारंभाची सर्व सिद्धता झालेली आहेच. आतां तिकडेच चलावें.

(जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—राजदरबार.

(वीरवर्मा राजा सिंहासनावर बसलेला आहे, राजगुरु, मंत्री, इतर राजे, सरदार बसलेले असतां पडदा उघडतो.)

राजा—

पद. (राग—केदार) दादरा.

भाग्यवान मजसमान नाहिं भूवरी ।। काय मला अतुल सौख्य होइ अंतरीं ।। ध्रु० ।। सुज्ञ तुह्मी मंत्री जन साह्य होउनि ।। राज्यकार्यभार शिरीं सतत घेउनी ।। वागतसां दक्षपणें सकल मम पुरीं ।। त्या योगें सर्व प्रजा तुष्ट किति तरी ।। भाग्यवान० ।। १ ।।

हे समस्त नृपतिश्रेष्ठ, अमात्यवर्ग, तसेच सरदार हो, परमेश्वराच्या कृपादृष्टीनें व आपणा सर्वांच्या सुदैवानें आपणास सांप्रत जें अनुपम सौख्य मिळत आहे, तें अत्यंत स्पृहणीय आहे! पहा, आपल्या राज्यावर मोठमोठीं संकटें आलीं, पण ईश्वराच्या कृपेनें आपला सर्वत्र विजयच होत आला आहे. खरोखर, राजा आणि प्रजा जर आपापल्या कर्तव्याला अनुसरून वागतील, तर उभयपक्षींच्या सुखास पारावारच नाहीं. कारण,

पद. (राग—गौडसारंग.) चाल—साध्य नसे मुनिकन्या.

सौख्य असे नृपतीला ।। किति तें ।। सकल प्रजेचा तोषचि असला ।। ध्रु० ।। अखिल सुखांचा दाता पहिला ।। महिवरि आहे भूपति गणिला ।। राज्याला आधारचि सगळा ।। तैसा नृपसौख्याला ।। जनसंतोषचि वाटे मजला ।। सौख्य असे० ।। १ ।।

राजगुरु—राजा, सत्य भाषण केलेंस. आजपर्यंत या अवनितलावर जे जे नामांकित राजे होऊन गेले, त्यांनी आपलीं कर्तव्यें व प्रजेचा संतोष अगदीं पूर्णपणें पाळिला होता. श्रीरामचंद्राची उक्ति पहा:—

" स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ॥
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥ १ ॥

तस्मात् आपलें भाषण अगदीं यथार्थ आहे.

राजा—गुरुमहाराज, आजपर्यंत जगन्नियंत्याच्या कृपा-दृष्टीनें व पूर्वजांच्या आणि आपल्या आशीर्वादानें मी आ-पल्या कर्तव्याला अनुसरून यथाशक्ति प्रजेचें पालन केलें आहे. आतां यापुढें तृतीयाश्रमाचा स्वीकार करण्याचा संकल्प केल्याप्रमाणें चंद्रसेनास राज्यभिषेक करण्याची सर्वसिद्धता करून ठेविली आहे, तेव्हां यथाशास्त्र समा-रंभास प्रारंभ करावा अशी आपल्या चरणीं विनंति आहे.

राजगुरु—फार उत्तम आहे राजा. तुझा हा उद्देश अगदीं स्तुत्य आहे. धर्मानुगामी क्षत्रियवीराला हें च उचित. (चंद्रसेनास उद्देशून) चंद्रसेना: आतां तुजकडे राज्य-कारभाराचें काम सोंपवून तुझ्या प्रिय जनकानें तृतीयाश्र-माचा संकल्प केलेला सर्वांस विदितच आहे. त्या प्र-माणें आतां राजचिन्हें धारण करून सिंहासनारूढ व्हाव-याचें आहे. तसेंच, यापुढें आपल्या पूर्वजांच्या थोर परा-क्रमांचें निरंतर स्मरण ठेवून क्षत्रियधर्माला अनुसरून सर्व प्रजेला सौख्य देण्यासाठीं सदैव दक्ष रहावयाचें आहे.

चंद्रसेन—(राजगुरूंस व राजास वंदन करून) गुरु-महाराज, प्रिय तात महाराज, आपली आज्ञा व योजना मला शिरसामान्य आहे. आजपर्यंत शस्त्रास्त्र विद्येमध्यें जें नैपुण्य संपादन केलें आहे, तें सफल करण्याची सुसंधि प्राप्त होणार याविषयीं मला परमानंद होत आहे. परंतु आतां महा-राजांच्या चरणांचें दर्शन दुर्लभ होणार हें पाहून मात्र गहिं-

वर येतो. कारण प्रेमाचें सामर्थ्यच तसें विलक्षण आहे

पद. राग पिलु (चाल–आइ बइरिआ) त्रिताल.

प्रेमाची बहु वृत्ति अनावर ।। इष्टचि सकलां प्रेम
महीवर ।। ध्रु० ।। उच्चानीचि हा भेद न जाणे ।।
जडलें तथुनि परत न जाणें ।। प्रेमास्तव निजप्रा–
णहि देणें ।। सकलां इष्टचि गमे खरोखर ।। प्रेमाची०।।१

राजा—प्रिय बालका चंद्रसेना तुझें ह्मणणें खरें आहे. पण असें पहा:—

पद. राग–परज. (नच तुझ्या संतति ती०) ही चाल.

आजवरी थोर किती, भूमिपती या जगतीं ।।
वाहुनियां राज्यधुरा, परमार्थी रत होती ।। १ ।।

तसेंच आणखी,

" सेवुनि ऐहिक सुख मग, सकल भोग दूर करा ।।
परमार्थीं मन ठेवा, आत्मोन्नतिमार्ग धरा ।। १ ।।

असें जें व्यवहारशास्त्र रहस्य आहे,तें तुला अवगत आहेच.

राजगुरु–राजा, सत्य भाषण केलेंस. अध्यात्म रामायणांतहि असेंच प्रतिपादन केलें आहे:—

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः । कृत्वा समासादित
शुद्धमानसः ।। समाप्य तत्पूर्वमुपात्तसाधनः ।समाश्रये
त्सद्गुरुमात्मलब्धये ।। १ ।।

वर्णाश्रम धर्मांचें पालन हेंच मनुष्याच्या ऐहिक व पारमार्थिक उन्नतीचें मुख्य साधन आहे.

धर्मदक्ष–(चंद्रसेनास उद्देशून) महाराजांनीं व गुरुवर्यांनीं जें सांगितलें, तें सर्वस्वी खरें आहे.

चंद्रसेन—गुरुमहाराज, तात महाराज, आपल्या आज्ञे-प्रमाणें वागण्यास मी सर्वदा सिद्धच आहे.

धर्मदक्ष—गुरुमहाराज, समारंभाची सर्व सिद्धता आहे खरोखर, हा समारंभाचा योग पाहून,

साकी.

सुखवुनि सकलां निजप्रतापें दिनकर अस्ता जाई ॥
पूर्णचंद्र तें आल्हादभरें उदयगिरीवरि येई ॥
तैसा योग भला ॥ वाटे सांप्रत हा घडला ! ॥ १ ॥

राजगुरु—प्रधानजी, आपण ह्मटल्याप्रमाणें हा योग भासतो खरा असो; (चंद्रसेनास उद्देशून) हे अलंकार व हीं राजचिन्हें धारण करून सिंहासनाच्या अग्रभागीं आरूढ व्हावें.

चंद्रसेन—(उभा राहून हात जोडून)

पद. (राग—सिंध—भैरवी) दादरा.

प्रभो विभो दयाघना ॥ करिं सदा सुरक्षणा ॥ ध्रु० ॥
सर्गस्थिति लयकर्ता ॥ निजभक्तांचा त्राता ॥ दुष्ट
जनांचा शास्ता ॥ तूंचि अघविनाशना ॥ प्रभो० ॥
सदय दृष्टि मजवरि तव ॥ भो जगत्पते सदैव ॥
ठेविं हेंचि मी अभिनव ॥ प्रार्थितों निरंजना ॥ १ ॥

(चंद्रसेन राजगुरूंस व राजास वंदन करून सिंहासनारूढ होतांच सर्वत्र जयजयकार होऊन मंगलवाद्यें वाजूं लागतात.)

वारांगना—(राजास वंदन करून नृत्य करूं लागतात.)

पद. (राग—झिंजोटी, ताल त्रिवट)

किति धन्य दिवस अजि येई ॥ किति० ॥ ध्रु० ॥
नयनमनोहर उत्सव देखुनि; हर्षमग्न मन होई ॥

किति० ॥ १ ॥ जय जगदीशा ॥ नव भूपतिला;
सौख्य निरंतर देंई ॥ किति० ॥ २ ॥

पद. (चाल—मम प्रणाम तुलारे०)

प्रभु करा सुखी या भूपतिला ॥ ध्रु० ॥ ठेवा अनुदिनि
निज अनुकंपा ॥ क्लेशहरण करिं निरसुनि ताषा ॥
शत्रुविनाशा सहाय व्हावें ॥ पतिला ॥ प्रभु
करा० ॥ प्रार्थितों तुजला ॥ द्यावें यातें सौख्य तें ॥
चिरकालिक जें ॥ भवतारक जें ॥ अघनाशक जें ॥
ठेवा अनु० ॥ १ ॥

(नंतर हार, तुरे, अत्तर, गुलाब वगैरे होऊन ' चंद्रसेन महाराज की जय ' असा त्रिवार जयघोष होऊन दरबार खलास होतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—राजरस्ता.

(कांहीं नागरिक बोलत प्रवेश करितात)

एक आमचे थोरले महाराज भाग्यशाली तर खरेच. केवढाले मोठमोठे बिकट प्रसंग या राज्यावर आले, पण महाराजाना कधीं अपयश ह्मणून आलें नाहीं.

दुसरा—अहो, परमेश्वरावर दृढनिष्ठा असली, आपलें आचरण नीतिशुद्ध असलें, आणि बुद्धि कधीं कर्तव्य पराङ्मुख झाली नाहीं, ह्मणजे मग कोणाचें भय नाहीं.

एक शास्त्री—(तपकिरीची चिमटी ओढून) जेहत्ते तुमचें भाषण सर्वथैव सत्य आहे. कृष्णांनीं जेहत्ते अर्जुनाला

असें एक रहस्य गीतेच्या ठायीं निवेदन केलें आहे कीं 'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम' ह्मणजे, भगवान् जेहत्ते कालाच्या ठायीं ह्मणतात कीं, बा अर्जुना, माझ्या ठायीं ज्याचा जसा भाव, तसें जेहत्ते माझ्याकडून त्या प्रिय भक्ताचें चिरकाल संरक्षण होत असतें.

एक भिक्षुक—शास्त्रीबुवा, पण तुमचा हा न्याय कांहीं सर्व ठिकाणीं सारखा लागू पडत नाहीं. कारण, आपण व्यवहारांत असें पाहतों कीं, बहुतकरून दुष्टबुद्धि लोकांकडून सज्जनांचा बहुत उपहास व छळ होत असतो.

एक गृहस्थ—भटजी, तुह्मी ह्मणतां तेंच खरें, कारण, परमेश्वराच्या ठिकाणीं पक्षपातबुद्धि असावी किंवा शक्तिमान् दुष्ट लोकांकडून सज्जनांच्या गुणांची कसोटीची परीक्षा होत असावी, असें त्यांचा जो कधीं कधीं निष्कारण छळ होत असतो, त्यावरून ह्मणावें लागतें.

शास्त्री—हा कांहीं वाद करण्याचा समय नव्हे, तस्मात् अस्मादिकांनीं ह्या कालाच्या ठायीं विशेष व्याख्यान करण्याचें प्रयोजन नाहीं. जेहत्ते आमच्या महाराजांवर सच्चिदानंद प्रभूची बहुत कृपा.अतएव जेहत्ते एवढा प्रस्तुत समारंभ कसा शांत रीतीनें आणखी निर्विघ्नपणें सिद्धीप्रत जाता झाला.

भिक्षुक—खरेंच शास्त्रीबुवा,आपल्या देखत कर्त्यासवरत्य पुत्राला राज्याचा अधिकार देऊन आपल्या जन्माचें सार्थक करण्याकरितां तृतीयाश्रमाचा स्वीकार करण्याची बुद्धि फलद्रूप होण्याला कांहीं तरी पूर्वपुण्याचीच बळकटी पाहिजे.

एक व्यापारी—भटजी बुवा. तुमचें बोलणें सारें खरें. पण आ त्चा जन्मस्वभावच पडला तिथें काय कोण करणार. आ-

ही सारा जन्मभर वेपार करून रात्रदिवस धनाचा सांठा करण्यांत चूर असतां. नाहीं देव ना धर्म. नाहीं आचार ना विचार असलें जिणें काय कामाचें ?

एक सावकार–(एकीकडे आपल्याशीं हंसून) कसलें आलें आहे जन्माचें सार्थक आणखो साफल्य. जोंपर्यंत सहीचा जोर चालतो आहे, तों घ्यावा हात मारून. पुढचें पुढें. कसला घेऊन बसले आहेत प्रपंच आणि परमार्थ. खुळें कुठली. नुसता काथ्याकूट करण्यांत काय अर्थ ? मिळेल तों पर्यंत खुशाल खावें, त्यानें आणि चैन करावी. (उघड) शेटजी, पण कधीं दानधर्म करण्याचा प्रसंग आला तर.

एक भिकारी–(मध्येंच) मग काय राव इचारतां शेटजी-च्या डोळ्यास्नि समूर काय बी दिसत न्हायसं व्हतं. ते सव-तांच्याच कुऱ्यांत नि उलाढालींत रातनादिस अक्शी गढलेलें.

व्यापारी–(जरा रागानें भिकाऱ्याकडे पाहतो.)

एक गृहस्थ—(इकडे तिकडे पाहून) हे पहा हजारों लोक राजवाड्याकडे जाऊं लागले आहेत. आज थोरल्या महाराजांच्या स्वारीचें प्रयाण असल्यामुळें राजवाड्याकडे एक सारखी गर्दी होऊं लागली आहे. आपणहि आतां तिकडेच जाऊं चला.

सर्व—हो हो, बरी आठवण केलीत. नाहीं तर, आपलें हें गोष्टींचें गुऱ्हाळ कांहीं लौकर संपलें नसतें. (सगळे जण लगबगीनें निघून -जातात.)

प्रवेश ४ था.

स्थळ—राजधानीबाहेरच्या अरण्यांतील शंकराचें देऊळ.
(वानप्रस्थाश्रमाला उचित वेष धारण केलेला
वीरवर्मा राजा प्रवेश करितो.)

राजा—

पद. (चाल—प्रियेनें त्या मदिय.)

जगन्नाथा, मला त्राता तुझ्यां वीणें नसे कोणी ॥
कृपा करुनी मला तारीं विनंती ही प्रभो चरणीं ॥
सदा योगी रमूनीयां एक चित्तें तुझ्या ध्यानीं ॥
दंग असती मुनी तैसे प्रभो अपुल्या यशःश्रवणीं ॥ १ ॥

पद (चाल—तों तननन वाजवि०)

जयशंकर पार्वति रमणा ॥ निज दास विपत्ती हरणा ॥
खलरिपुमद दमना शरणा ॥ जय० ॥ ध्रु० ॥ सर्प
भूषणा अघसंहरणा ॥ विबुधमुनीजन सेविति
चरणा ॥ शरणा ॥ जय० ॥ १ ॥

श्रीशंकरा, गंगाधरा, भक्तजन तारका, आपल्या चरणीं सहस्रशः वंदन असो. पूर्वी संकल्प केल्याप्रमाणें तृतीया श्रमाचें सेवन करून कोणा तरी महाभाग सद्गुरूच्या कृपा-प्रसादानें माझे मनोरथ पूर्ण करावे, एवढी चरणांपाशीं वारं-वार प्रार्थना आहे.(ईश्वरचिंतन करित असतां ध्यानस्थ होतो.)

(चंद्रसेन व धर्मदक्ष प्रधान पुढें होऊन श्रीशंकरास
व राजास वंदन करितात.)

राजा—(कांहीं वेळानें वर पाहून) बाळा चंद्रसेना, प्रधानजो, बसावें. आजपर्यंत मी गृहस्थाश्रमामध्यें होतों.

श्रीशंकराच्या कृपाप्रसादानें माझा वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा संकल्प सिद्धीस गेलाच आहे. प्रधानजी, सर्व राज्याचा भार आतां तुमच्यावर आहे. आपल्या राज्याची अंतर्बाह्य स्थिति तुह्मांला अवगतच आहे. स्वराज्याचा अभिमान जागृत ठेवून दुष्टशत्रूंचा आशाभंग करा. तुह्मी सुज्ञ, अनुभवी, राजनीतिनिपुण आहांत, तेव्हां अधिक काय सांगावें. ?

धर्मदक्ष—महाराज, या वेळीं माझा कंठ गहिंवरून आल्यामुळें माझ्यानें ज्यास्त बोलवत नाहीं. परंतु महाराज,

पद. (चाल—क्षणैक यौवन.)

प्रोत्साहन हें तोषचि देई ॥ सकलहि सेवा सफलचि होई ॥ आजवरी म्यां प्रभुसेवेला ॥ सदा देह हा असे वाहिला ॥ सार्थक त्याचें वाटे मजला ॥ गौरव देखुनि हा भूपाला ॥ हर्षपूर मनिं दाटुनि येई ! ॥ प्रोत्साहन० ॥ १ ॥

चंद्रसेन—तात महाराज, आपल्या व प्रधानजींच्या निरंतर उत्तम उपदेशानें माझ्या मनोवृत्तींना उत्कृष्ट संस्कार घडला आहे. श्रीशंकरावर पूर्ण निष्ठा ठेवून कर्तव्यमार्गांत सहाय करण्याविषयीं मी त्याची निरंतर प्रार्थना करित जाईन.

राजा—(गहिंवरून) बाळा चंद्रसेना, तूं सुज्ञ आहेस; परंतु, कोणतेंहि काम अविचारानें करूं नकोस. तूं शूर आहेस, परंतु, आपल्या वैभवाचा आणि सामर्थ्याचा कधीं गर्व मानूं नको. तसेंच, तूं परमेश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवून शुद्धाचरणानें वाग ह्मणजे तुझे उद्देश सफल होत जातील.

चंद्रसेन—तात महाराज, आपला हा उपदेश मी कधींहि विसरणार नाहीं. फार काय सांगूं ?

पद. (चाल—यदुवीर श्रीकृष्णाचे०)

निज कर्तव्यांचें उल्लंघन नच होइल कधिं ताता ॥

मम पराभवाची अल्पहि नलगे कालत्रयीं चिंता ॥
प्रभूला ॥ स्मरत असें ॥ सेवितसें ॥ प्रार्थितसें ॥
करीतसें ॥ दृढभक्ती मी तरि कां होईल कुणि मज
भयदाता ॥ निज० ॥ १ ॥

राजा—बाळा चंद्रसेना प्रधानजी तुमचें भाषण ऐकून व वीरश्री पाहून मला परम संतोष होत आहे. आजपासून आतां आपला वियोग होणार. राज्यकारभारादि कामें नेहमीं पहात्रयाचींच आहेत. तथापि, एवढें विशेष लक्ष्यांत ठेवा कीं,

पद. (चाल—ईश प्राप्तीस्तव०)

मायामय हा प्रपंच सगळा जीव तया भुलला ॥ अनन्य-
भावें शरणचि जावें हरिच्या पदकमला ॥ ध्रु० ॥
सुख दुःखें हीं मोहविती हो बळेंच चित्ताला ॥ काम
क्रोधादिक षड्रिपु हे छळिती सकळांला ॥ कोणी नच
या भूवरि मृत्यूहस्तांतुनि सुटला ॥ यास्तव तनुचें
सार्थक करणें पुरुषार्थचि पहिला ॥ मायामय ० ॥ १ ॥

धर्मदक्ष—महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवण्यास हा दास सर्वदा तत्परच आहे. तसेंच, आपला उपदेशहि सर्वकाळ ध्यानामध्यें ठेवण्याचा पूर्ण संकल्प व निश्चय आहे. चिंता नसावी.

चंद्रसेन—प्रियतात महाराज, यावेळीं विरहदुःखानें उचंबळून गेल्यामुळें माझ्यानें विशेष कांहीं बोलवत नाहीं. परंतु, फार काय सांगूं, आपला उपदेश ह्मणजे खरोखर,

पद.(जंगला—दादरा.)

अमृत मूर्तिमंत हें सजीव कीं करीतसे ॥ सकलचित्त-
वृत्तिमला हरुनि दूर नेतसे ॥ ध्रु० ॥ धर्मशास्त्र-

चिंतनीं ॥ बुद्धिला निशीदिनीं ॥ गुंतविणें अभ्युन्नतितत्व हें जगीं असे ॥ अमृत० ॥ १ ॥

राजा—ठीक आहे. बाळा चंद्रसेना, प्रधानजी, आतां राजधानी पासून मजबरोबर बरेच दूर आलांत, करितां परत जाणें उचित होय.

चंद्रसेन—प्रधानजी, प्रेमातिशयामुळें लौकर परत जाण्याची उत्कंठा होत नाहीं.

राजा—(गहिंवरून) बाळा, तुझें ह्मणणें खरें. पण धर्मशास्त्राप्रमाणें वर्णाश्रमधर्माचें पालन करणें यांतच मनुष्याचें खरें कल्याण आहे. तें साध्य करून घेतलें पाहिजे, समजलास.

चंद्रसेन—(सद्गदित होऊन राजास वंदन करितो.)

राजा—वत्सा, विजयोस्तु. प्रधानजी, आतां विलंब लावणें प्रशस्त नाहीं.

धर्मदक्ष—(आज्ञामहाराज. (वंदन करितो.)

राजा–वत्सा चद्रसेना, प्रधानजी, ईश्वर कृपेनें सर्वांचें कल्याण होवो. (चद्रंसेन व प्रधान जातात.) अहाहा ! प्रेमाचा पाश मोठा प्रबळ आहे. पुत्रप्रेमानें माझी कडकडीत वैराग्यवृत्ति क्षणभर डळमळूं लागलीच आतां मात्र मी संसार बंधापासून सर्वथैव मुक्त झालों.

साकी.

निरखुनि सकलां सोडुनि सारीं ऐहिक सुखदुःखें तीं ॥ महाभाग सद्गुरु प्रसादें मिळवावी चिरशांती ॥ हेतु पूर्ण करो । दयाघन भवनिधि हा उतरो ! ॥ १ ॥

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—पुष्प वाटिका.

(मालिनी व चंद्रिका ह्या दोन दासी फुलें वेंचीत प्रवेश करितात.)

मालिनी—चंद्रिके, किती ग बाई तरी या पुष्पवाटिकेमध्यें सुगंधी फुलांचा घमघमाट सुटला आहे हा ! खरोखर गडे, तरुण स्त्रीपुरुषांना अशीं स्थळें मनोहर व रमणीय वाटतात, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

चंद्रिका—बाई मालिनी, तूं ह्मणतेस तें अगदीं खरं. इकडे पहा:—

पद. (चाल—आनंदानें गजमुख ध्यावा.)

कुसुम फलांनीं तरुवर भरले ।। पुष्पसुवासें मन्मम
रिझलें ।। ध्रु० ।। शीतल वायू बहु तोष देती ।। खेद
मनाचा हरण करीती ।। प्रेमाची जणुं येउनि भरती ।।
लता तरूंना बघ भेटताती ।। चित्त सखे मम वेधुनि
गेलें ।। सुमसंचयाचें भानहि नुरलें ! ।। कुसुम० ।।१।।

मालिनी—हो ! गडे चंद्रिके, बरी आठवण झाली. अलीकडे आपल्या बाईसाहेबांची चर्या खिन्न नाहीं का ? दिसत ! तुला कसं वाटतं ?

चंद्रिका—खरं सांगूं का, मला सुद्धां तुझ्यासारखीच शंका वाटूं लागली आहे. पण बाई मालिनी, याचं कारण तरी काय?

मालिनी—गडे चंद्रके, ताईसाहेबांच्या विवाहाचा विचार चालला असल्यामुळं, त्या संबंधी कांहीं कमी जास्त हकीगत त्यांच्या कानावर आली असेल, दुसरं काय असायच ?

चंद्रका—बाई मालिनी, तुझा तर्क बरोबर असावा. काल सकाळीं रोजच्या सारखी ताईसाहेबांकडे गेल्यें, तों स्वारी कित्येक तसबिरी लक्ष्यपूर्वक पाहत होती, ह्मणून पुढें न जातां मी त्याच पावलीं हळूच मागें परतलें.

मालिनी—(समोर पाहून) सखे चंद्रिके, ही पहा समोरून ताईसाहेबांची स्वारी इकडेच येत आहे, तर चल आपण फुलं वेंचीत इथेंच असूं.

(मोहना हस्तामध्यें एक तसबीर घेतलेली अशी प्रवेश करिते)

मोहना—(आपल्याशीं) सगळ्या गोष्टी अनुकूल असल्या, तरी सुख अनुभवणं हें मनाच्या स्थितीवर अवलंबून असतें, असं ह्मणावं लागतं. माझीच स्थिति पहाना?

पद.(चाल—व्यर्थ आह्मी अबला.)

व्यर्थ असे सुख तें ॥ खचित बाई० ॥ ध्रु० ॥ परानुग्रहें भास होय जें, क्षणिकचि तें असतें ॥ खचित ० ॥ १ ॥ स्वावलंबना वांचुनि सारें शून्य जगीं दिसतें ॥ खचित ० ॥ २ ॥ स्वातंत्र्याविण जीवन कितितरि, दुःखद हें गमतें ॥ खचित०॥३॥

पहा ! आज मला कांहीं तरी कमी आहे का ! दास, दासी संपत्ति कोणत्याही रीतीनं मला कधीं कमीपणा ह्मणून नाहीं पण इतकं असूनहि,

पद. (चाल—दया करा मजवरी०)

गमे मला जग उदास सगळें ॥ ध्रु० ॥ बहुविध
सौख्यें सन्निध असुनी, शांति मनाला कधीं नच
मिळे ॥ गमे ० ॥ १ ॥ कनक रत्नमय पंजर गततो
शुक जैसा मनिं सदा हळहळे ॥ गमे ॥ २ ॥
रात्रंदिन चिंताकुल ॥ चित्ता वर्षवर्षसम भासति
विपळें ० ॥ गमे ० ॥ ३ ॥

एवढं ऐश्वर्य मला अनुकूळ आहे, तरी इष्टवस्तूची प्राप्ति होई पर्यंत मनाला तादृश सुख व समाधान व्हायचंच नाहीं.

(मालिनी व चंद्रिका पुढं येतात.)

मालिनी—बाई साहेब, थोडींशीं उत्तम फुलं बरोबर घेऊन आतां आपल्या कडेसच येत होतें, इतक्यांत वाटेंत ही चंद्रिका भेटली.

मोहना—मालिनी, ह्या पुष्पवाटिकेमध्यें मालती, शेवंती, जाई, जुई, चमेली कशा टवटवीत दिसत असून फुलांनीं अगदीं जशा कांहीं ओथंबल्या आहेत.

चंद्रिका—खरंच ताईसाहेब, या पुष्पवाटिकेंत आलं किं-नाहीं, ह्मणजे क्षणभर मनाची व्यग्रता नाहींशी होऊन समा-धान वाटतं.

मोहना—(किंचित् खिन्न होऊन व दीर्घश्वास टाकून) पण बाई चंद्रिके, मनालाच जर स्वस्थपणा नसला किं नाहीं, ह्मणजे बाह्यसुखं किती जरी अनुकूल असलीं तरी तीं दुःख-मय वाटतात. कारण,

पद. (चाल—जन खुळावले.)

सुख महीवरी ॥ मन सुशांत हें जरी ॥ ध्रु० ॥

अल्पहि उत्साह नसे ॥ चित्त सदा व्यग्र असे ॥
कुठुनि सौख्य जगिं भासे ॥ सखये, तूं सांग
तरी ॥ सुख मही० ॥ १ ॥

मालिनी—खरंच ताईसाहेब, मनाला चैन असल्याशिवाय खरं सुख कुठून मिळणार ? (विनोदानें) पण आतां आपल्याला किंनाहीं एवढं खिन्न व्हायला नको. ईश्वरकृपेनं लौकरच आपले मनोरथ पूर्ण होतील.

चंद्रिका—खरंच गडे मालिनी, मग काय ताईसाहेबांना आपल्याजवळ बोलायला सुद्धां फुरसूत व्हायची नाहीं !

मोहना—(किंचित् स्मित करून) पुरे करा बाई हा विनोद. चंद्रिके, ही वस्तु (वस्त्राच्छादित तसबीर पुढें करून) अगदीं गुप्तपणं आईकडे नेऊन दे. मालिनी, तूं सुद्धां चल पुढें.

मालिनी व चंद्रिका—ठीक आहे ताईसाहेब.

(दोघी निघून जातात)

मोहना—मी आपला निश्चय तर ठरविलेलाच आहे. तेव्हां परमेश्वराजवळ एवढंच मागणें कीं,

पद. (चाल–जय कृष्णातटवासा) दादरा.

जय श्रीशंकर ईशा ॥ भयहरणा गिरिजेशा ॥ सफल
करीं मम आशा० ॥ ध्रु० ॥ सकल असे तुजवरती ॥
मम निष्ठा विश्वपती ॥ अमित लोक उद्धरती ॥
जरि तुजला शरण येति ॥ पूर्ण करीं मम विनती ॥
प्रार्थितसें जगदीशा ० ॥ जय ० ॥ १ ॥

(जाते.)

प्रवेश २ रा.

स्थळ—राजमहाल.

प्रभावती—(आपल्याशीं) मनुष्यमात्राला अपत्य हें एक मोठें सुख असतें. अपत्यसुख नसणें हें दुर्दैवच समजलें पाहिजे. त्यांतल्या त्यांत पुरुषापेक्षां बायकांना मुलीचीच आवड ज्यास्त असते. पण वास्तविक ह्मटलं तर,

पद. (चाल—वधू ही वल्ली.)

असे परक्याची ॥ कन्यका ॥ ठेव ही साची ॥ ध्रु०॥
अनुरूप सुंदर पति केंवि तिला ॥ मिळुनि सासरीं प्रिय
सकळांला ॥ होइल कैशी; न पडो तिजला ॥ वाण
सौख्याची ॥ काळजी मनाला टोंची ॥ असे० ॥१॥

(जरा स्तब्ध राहून) बरें, आज अजून प्राणनाथांची स्वारी इकडे कशी आली नाहीं ? (समोर पाहून) अगबाई, आलीच स्वारी इकडे.

(वीरकांत राजा प्रवेश करितो, त्यास आलिंगन देऊन बाजूस बसते.)

वीरकांत—(उत्कंठेनें) प्रिये, सांग पाहूं आपल्या मोहनें कोणत्या राजपुत्राची तसबीर पसंत करून त्याला वराविषयीं आपला उद्देश कळविला तें.

प्रभावती—प्राणनाथ,

दिंडी.

अंगदेशींचा भूप चंद्रसेन ॥ रूपसुंदर बहु सकल-
गुणनिधान ॥ कन्यकेनें अनुरूप बघुनि शीला ॥
तया वरण्याचा हेतु दर्शवीला ॥ १ ॥

वीरकांत--(किंचित् खिन्न होऊन) प्रिये, ही योजना तुला आवडली का?

प्रभावती--कां बरं प्राणनाथ, राजपुत्र चंद्रसेनाची सौंदर्याविषयीं आणखी सुस्वभावा विषयीं सर्वत्र ख्याति आहे. तेव्हां मोहनेनं त्याला पसंत केलं हें ठीकच झालं, असं आपलं मला वाटतं.

वीरकांत--पण प्रिये, कामपाल राजाकडून मोहनेकरितां मागणी आली होती, हें तुला स्मरत असेलच.

पद्मावती-- मग प्राणनाथ, मोहनेनं कामपालाला वरावं असा का आपला उद्देश आहे?

वीरकांत--प्रिये, असें नव्हे. पण आपला आशाभंग झालेला पाहून त्याचा आपल्यावर रोष नाहीं का होणार? तशांतून त्याच्या स्वभाव पडला मत्सरी. आणखी त्याचें सामर्थ्यहि मोठें आहे. तेव्हां पुढें मागें कोणता प्रसंग येईल न जाणो. कारण,

पद. (चाल-वस्त्रानें देह सारा०)

आशेचा भंग झाला मनिं ऐसें आणुनी ।। आह्मांतें
करिल पीडा रुष्ट बहु होउनी ।। मज न कळे दुष्ट
कोपें करिल अह्मां काय तें ।। मूर्खाचें चित्त केव्हां
न विवेका पावतें ! ।। १ ।।

पद्मावती--प्राणनाथ, हें काय बरं असें भिऊन वागावं? आपणाला हें खचित शोभत नाहीं.

वीरकांत--वेडी कुठली ! कामपालाच्या सामर्थ्याचें मला भय वाटतें, अशी का तुझी समजुत झाली?

पद्मावती--तसें नव्हे प्राणनाथ.

वीरकांत—मग काय तर ! मला सुद्धां, मोहनेनें चंद्रसेनाला वरण्याविषयीं आपला उद्देश व्यक्त केला, हें पाहून संतोषच होत आहे.

पद्मावती—माझें तरी ह्मणणं असंच कीं, त्या कामपालाचं सामर्थ्य मोठं कां असेना. त्याचें वर्तन जर खोटं आहे, तर त्याला कांहीं भ्यायला नको.

वीरकांत—प्रिये, मला एवढीच शंका आली कीं, न जाणों एकदम क्रोधाविष्ट होऊन तो दुष्ट काय करील, याचा नेम नाहीं.

पद्मावती—पण प्राणनाथ, परमेश्वर सत्याचा वाली आहे-ना ? संकटकाळीं त्याला शरण गेलं, ह्मणजे तो कोणत्याहि रीतीनं खचित साहाय्य करील; कधीं उपेक्षा करणार नाहीं.

वीरकांत—शाबास प्रिये, तुझ्या विवेकाचा व चातुर्याचा आज मला उत्तम उपयोग झाला. मनुष्यानें सत्यमार्ग न सोडितां धैर्यानें वागावें हेंच खरें; मग येइनात कां संकटें त्याच्यावर.

पद. (चाल—भूमिजल तेज.)

काय तो धाक गे संकटांचा मनीं ॥ शौर्यधैर्याश्रयें
राहि जरि कां ॥ शस्त्र करिं घेउनी;, वीर्य नच
सोडुनी ॥ खंडिलें दुष्ट कृत्यांस जरि कां ॥ १ ॥
असे व्यर्थ तें व्यर्थ गे जन्म अपुलें ॥ जरि कधीं
शौर्य ना दाखवियलें ॥ काय तो० ॥ २ ॥

पद्मावती—योग्य भाषण केलं प्राणनाथ.

वीरकांत—प्रिये, मोहनेला चंद्रसेनासच देण्याचा निश्चय ठरल्याप्रमाणें आतां विवाह समारंभाच्या तयारीस लागलें पाहिजे एकंदरीनें सांप्रत.

साकी.

मन्मन चिंतेपासुनि सखये मुक्त असे बघ झालें ।।
कन्येनें निज चातुर्यानें अतितर प्रमुदित केलें ।। हेतु
पूर्ण करो ।। दयाघन शिव सौख्या पितरो ।। १ ।।

(पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—राजमार्ग.

(दोन भिक्षुक दोन बाजूंनीं प्रवेश करितात.)

रामभट—नमस्कार भिकंभट नमस्कार ! कसें काय सध्यां लग्नसराईंत अगदीं यथेच्छ धनप्राप्ती होत आहे ना ?

भिकंभट—अहो रामभट, कितीहि द्रव्य मिळालें तरी समुद्रांत बुडी मारून वर येणाऱ्या शंखाप्रमाणें आह्मी आपले कोरडे ते कोरडेच.

रामभट—(गोंधळून) ह्मणजे ते कसें काय भटजी ?

भिकंभट—अहो संसारामध्यें आह्मांला नांवाप्रमाणें बरोबर करणी करून दाखविण्याचा वारंवार प्रसंग येतो.

रामभट—अजून तुमच्या ह्मणण्याचा अर्थ मला कळत नाहीं.

भिकंभट—(काठी सांवरून) अहो रामभट, माझें नांव काय, भिकंभट, भिकं ह्मणजे भिक्षा.ती मागणें हें आहे व्रत किंवा कर्म ज्यांचें ते भिकंभट. आहे कीं नाहीं नांवाप्रमाणें करणी ? नाहींतर ‘ नांव सोनूबाई नि हातीं कथलाचा वाळा ! ’

रामभट—पण तुमच्या सारख्या वेदशास्त्रसंपन्नाला काय कमी आहे ?

भिकंभट—अहो, हल्लीं भिक्षुकांना कोण विचारतो ? भिक्षुक ह्मणजे पैशानें पांसरी. अगदीं परसांतली भाजी.

(सोमभट व अण्णंभट येतात व एकमेकांस नमस्कार करितात.)

अण्णंभट—कां भिकंभट, सध्यां कशीकाय भिक्षुकी चालते?

भिकंभट—वशिल्याशिवाय कसली भिक्षुकी चालते आहे? हो पण भिक्षुकी बद्दल तुमचा अभिप्राय कसा आहे सांगा.

अण्णंभट—खरं सांगूं भिकंभट, हल्लीं अध्ययनाला का किंमत आहे? ‘ शांति पुष्टि ’ करून ‘लटपटाध्याया’ चें प्रवचन करतां आलें कीं झालें. तशांत किती आर्जवें, कसकसली हांजी हांजी करावी लागते, कसकशीं संधानें बांधावीं लागतात, तेव्हां कुठें घृतकुल्या मधुकुल्येचा कपिलाषष्ठि योग येतो ! खेरीज, यजमानाची मोंपळीच्या देंटासारखी नाजूक तब्बेत संभाळतांना नाकीं नव येतात.

भिकंभट—(हंसून व मान डोलवून) बरोबर बोललेत अण्णंभट. आणखी एक मुद्दा असा आहे, ‘ याचको याचकं दृष्ट्वा श्वानवद्गुर्गुरायते. ’ अहो, भिक्षुकाला भिक्षुक खपत नाहीं!

रामभट—कुठें गेलें तरी पळसाला पानें तीनच. काशी केली वाराणशी केली, तरी कपाळाची कटकट चुकायची नाहीं. सध्यां सगळ्या धंद्यांची अगदीं अशी माती होऊन गेली आहे माती !

(पडद्यांत मंगल वाद्यें वाजूं लागतात)

सोमभट—(गडबडीनें) चला हो चला. राजवाड्यांत लग्नाचा वेळ जवळ आला. लौकर चला, नाहींतर सगळाच दक्षणा बुडेल.

(सर्वजण लगबगीनें निघून जातात.

प्रवेश ४ था.

स्थळ—दिवाणखाना.

धर्मदक्ष—धैर्यशील, थोरल्या महाराजांनीं वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करते वेळीं जो चिंता आपल्या मनामध्यें उत्पन्न झाली होती, तिचा परिहार उत्तम रीतीनें झाला, हें पाहून मला अतिशय आनंद होत आहे.

धैर्यशील—खरेंच आहे. रणसंग्रामामध्यें थोरल्या महाराजांचा पराभव होऊन ते पतन पावले, अशा शत्रु सैन्यांतील लोकांनीं उठविलेल्या खोटया बातमीवर विश्वास ठेवून राणीसाहेबांनीं शोकाच्या भरांत उतावळेपणानें प्राण-त्याग केला. तेव्हां पासून राजपुत्र चंद्रसेनावर लक्ष्य ठेवून त्याचें संगोपन करण्याचें काम आपणाकडेसच होतें. तेव्हां, आपल्या परिश्रमाचें दिवसें दिवस उत्तम फल दृष्टीस पडत आहे, हें पाहून आनंद होणें स्वाभाविकच आहे.

धर्मदक्ष—धैर्यशीला, मी आपल्या कर्तव्याला अनुसरून यथाशक्ति महाराजांची सेवा केली आहे, याविषयीं मला परम संतोष वाटतो. आणखी शास्त्ररहस्य तरी असेंच आहे कीं,

पद. (चाल—कलह कशाकरितां०)

जन हा वागे धर्मानें ।। मग हो सौख्या काय उणें।।
कुणाला नलगे आर्जवणें ।। चाल ।। कर्तव्यावरि
निष्ठा ठेवा ।। अन्य नको बघणें।। जन हा ० ।। १ ।।

धैर्यशील—खरें आहे प्रधानजी, थोरल्या महाराजांनीं राज्यकारभार आपल्यावर सोंपविल्यापासून सर्व प्रजेला पूर्वीप्रमाणेंच सुख मिळत आहे. तेव्हां, आपली कर्तव्य दक्षता अगदीं वर्णनीय आहे. तसेंच,

पद. (चाल—लग्नाला जातों मी०)

राजपुत्र चंद्रसेन निपजुनी गुणी ।। दावितसे शौर्य धैर्य

बहु रणांगणीं ॥ ध्रु० ॥ न्याय नीति वर्ततसे ॥
कर्तव्या दक्ष असे ॥ कापट्यें कधिं न फसे ॥ सौजन्यें
वागतसे ॥ द्यावयास त्यास ताप धजत ना
कुणी ॥ राजपुत्र ० ॥ १ ॥

हें तरी आपल्या कर्तव्य जागरूकतेचेंच फल होय.

धर्मदक्ष—बरें धैर्यशीला, एकंदरीनें आपल्या महाराजांना सौंदर्यानें, वयानें, संपत्तीनें व गुणसौष्ठवानें अगदीं अनुरूप अशी पत्नी मिळाली, हें दुधांत साखर पडल्यासारखें झालें.

धैर्यशील—खरें आहे प्रधानजी, महाराजांच्या गुणांस व सौंदर्यास पात्र अशीच ही वधू असल्याचें दिसत आहे. (समोर पाहून) ही पहा महाराजांची स्वारी इकडेच येत आहे, असें वाटतें. होय. आलेच महाराज.

(चंद्रसेन प्रवेश करितो.)

धर्मदक्ष व धैर्यशील चंद्रसेनास वंदन करितात.)

धैर्यशील—आज महाराजांची मनोवृत्ति विशेष प्रमुदित झाली आहेच. त्याप्रमाणें सर्व प्रजाजनांसहि अत्यानंद होणें स्वाभाविक आहे. कारण,

साकी.

जेंवि महासागरासि येउनि भरती जल वरि,चढतें ॥
त्या मागुनियां अल्पजलाशयजल वृद्धिंगत होतें ॥
तैसे हर्षभरें ॥ होती जन प्रमुदित सारे ॥ १ ॥

चंद्रसेन—शाबास धैर्यशीला. खूप चातुर्य खर्च केलेंस मर्मज्ञ मित्र असावा तर असाच असावा. असो, आजचा हा योग प्रधानजींच्या कर्तव्यदक्षतेचेंच फल बरें.

धर्मदक्ष—महाराजांनीं सेवकाचा निरंतर गौरव करित असावें, हें योग्यच आहे.

चंद्रसेन—धैर्यशीला, फार काय सांगूं ?

पद. (चाल–सोडुनि मज रामराम०)

गुरुसमान नीतिधर्म मजसि पढविले ।। विविधकला
ज्ञान साध्य करुनियां दिलें ।। ध्रु० ।। राजधर्म कोंवि
असति वागणें कसें ।। राजभक्ति कैशी जनमानसीं
बसे ।। हेंहि मला शिकवियलें प्रीतिनें भलें ।। मंत्रिवरें
युद्धकर्मनिपुण करविलें ।। गुरु० ।। १ ।।

धर्मदक्ष—महाराजांच्या ह्या अंतःकरणपूर्वक प्रोत्साहनानें मला अतिशय आनंद होत आहे. कारण,

पद. (चाल–नाहिं सुभद्रा या वार्ते तें०)

गौरव जरि कां प्रियवचनानें होई दासांचा ।। तुष्ट
राहुनी द्विगुणित वाढे प्रेमभाव साचा ।। ध्रु० ।।
प्रोत्साहन तें मिळतां पडतो विसरहि क्लेशांचा ।।
नष्ट होतसे विषाद अवघा सेवकचित्तींचा ।। गौ०।।

चंद्रसेन—प्रधानजी, आश्रितांना व प्रजेला वारंवार प्रोत्साहन देण्यामध्यें उभयपक्षीं कल्याण असतें. असो उदईक मोठ्या समारंभानें आपल्या राजधानीस जाण्याकरितां निघावयाचें. तेव्हां ती तयारी करा. धैर्यशीला, तूंहि प्रधानजींस साहाय्य कर.

धर्मदक्ष व धैर्य०—आज्ञा महाराज (वंदन करून जातात.)

चंद्रसेन—परमेश्वराची मजवर मोठीच कृपा, समजली पाहिजे. कारण, अनुरूप अशी भार्या मिळणें हें सुदैवाचें लक्षण आहे. खरोखर, विवाह हा एक मोठा चमत्कारिक ऋणानुबंध आहे; तो घडण्याला कांहीं तरी ईश्वरी संकेताचीच अपेक्षा असते. असो; सांप्रत,

साकी.

सुगुणमंजरी लावण्यवती प्रेमाची जणुं मूर्ती ।।

स्वीकारुनि मी धन्य जाहलों गृहिणी ऐशी सुदती।।
वाढविते साची ।। दयिता शोभा गेहाची ।। १ ।।

(जातो.)

दुसरा अंक समाप्त.



अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—विश्रांतिस्थान.)

कामपाल राजा—(आपल्याशीं) वीरकांत राजाकडे तसबीर पाठवून पुष्कळ दिवस झाले. अद्याप तिकडील कांहींच वर्तमान कळत नाहीं; यामुळें माझें मन वारंवार उद्विग्न होत आहे. (क्षणभर विचार करून) तसेंच, आज हे अपशकुन मला कांहीं तरी अनिष्टच सुचवीत आहेत.

पद. (चाल—रामको अधार.)

मला विरस वाटतें ॥ जगहि शून्य भासतें ॥ध्रु०॥
वामनेत्र स्फुरत असे ॥ स्थिरहि चित्त कां नसे ॥
पळहि गमे वर्ष जसें ॥ हृदय कांपतें ॥ मला० ॥१॥

अथवा, एवढी चिंता कशाला पाहिजे ? कारण,

पद. (चाल—लाल झालि कोपानें०)

काय तयाची भीति नृपाला जिंकुनि मद्धच करिन खरें ॥ तदात्मजेनें मजला वरणें होय तयाला उचित बरें ॥ ध्रु० ॥ व्यर्थ कशाला मजसीं स्पर्धा करुनी नाशाप्रति जावें ॥ भूपतिनें हें मनीं उमजुनी संबंधा नच तोडावें ॥ हें न घडे तरि झडकरि जाउनि युद्ध करानी जिंकावें ॥ गर्वांधाला शासन करितां वेंचिन भुजबल हें सारें ॥ काय० ॥ १ ॥

मग पाहतों माझा उद्देश कसा सफल होत नाहीं तो. (हातांत त्या मोहनेच्या तसबिरीकडे पाहून) अहाहा ! काय

हें दिव्य लावण्य ! त्या चारुगात्रीचें ' मोहना ' हें नांव अगदीं समर्पक आहे. ह्या असल्या अनुपम सौंदर्यानें कोण बरें मोहित होणार नाहीं ? (मोह उत्पन्न होऊन)

पद. (चाल—रडसि काय ह्मणुनि०)

प्रिय सखये भेटशील कधिं तरी मला ।। तुजविण
जग शून्य दिसे पुरविं हेतुला ।। ध्रु० ।। चित्त
तुझ्या सौंदर्यें सकल वेधिलें ।। मानस त्वच्चित-
नांत दंग जाहलें ।। प्रेमभाव हृदयिं पहा ! बहुत
दाटला ।। करिन पट्टराणि प्रिये खचित तूजला ।।
प्रिय सखये० ।। १ ।।

(तसबिरीचें चुंबन घेऊन व दचकून) अरे, ही तर तसबीरच आहे. त्या मनमोहनेचें चिंतन करीत असतां, तीच मूर्तिमंत मजपुढें उभी आहे कीं काय असा वारंवार भास होतो.

(इतक्यांत हेर प्रवेश करितो)

हेर—(वंदन करून) महाराज, आज्ञेप्रमाणें वीरकांताच्या राजधानीमध्यें जाऊन आलों.

कामपाल—(उत्सुकतेनें) मग सांग सांग, त्या राजकन्येनें कोणती तसबीर पसंत केली तें.

हेर—महाराज, सांगतों, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

कामपाल—असें संदिग्ध भाषण करूं नको. काय असेल तें स्पष्ट सांग.

हेर—महाराज, चंद्रसेन राजाला वरण्याविषयीं तिनें आपला उद्देश कळवून आणखीः—

कामपाल—(मध्येंच रागानें) आणखी काय ह्मणतोस ? माझा सर्वथैव आज्ञाभंग करून अपमान केला होय.

हेर—आणखी विवाह समारंभहि पण निर्विघ्नपणें झाला.

कामपाल—(क्रोधानें) वाहवारे मूर्खशिरोमणी, हेंच का मला सांगण्यासाठीं आलास. जा नीघ येथून (हेर निघून जातो.) मूर्खा वीरकांता, माझा आशाभंग करण्यास तुला कशी शंका वाटली नाहीं ? थांब तुला योग्य प्रायश्चित देतों.

पद. (चाल—अधम किति पालका.)

तुझा सूड बघ उगवितों दुष्ट भूपा ॥ चढविलें
मजसि तूं व्यर्थ कोपा ॥ ध्रु० ॥ गर्व तुज होउनी
मूर्खपण दावुनी ॥ कन्यका दिधलि त्या दनि-
रूपा ॥ मजासि अवमानुनी स्वबल नच पाहुनी ॥
मांडिलें वैर तूं मजसवें कां ॥ तुझा सूड० ॥ सज्ज
होवोनियां बाहुबल आपुलें ॥ दाखवीं मजसिं तू
पापरूपा ॥ चंद्रसेनासही बांधुनी आणितों ॥
हरिन मी तुमचिया शुष्कदर्पा ॥ तुझा सूड० ॥१॥

उद्यांचेउद्यां प्रथम त्या चंद्रसेनावर स्वारी करावयाची. मग पाहनों माझा हेतु कसा साध्य होत नाहीं तो (तरवार फिरवुन)

पद. (चाल—वाटे सर्वथा मुक्त झालों.)

खड्गा, दाखवीं शक्ति सारी ॥ ध्रु० ॥शत्रुरुधिरामती
मारुनी झडकरी ॥ पाठवीं यमपुरीं दुष्ट वैरी ॥
कीर्तिनें ह्या दिशा भरुन चारी ॥ खड्गा दाखवीं० ॥१॥

(आवेशानें निघून जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—राजमहाल.

भामिनी—(सचिंत आपल्याशीं) काय करावं ? मन एकदां काळजीनं व्यापलं किं नाहीं, ह्मणजे मग कांहींसुद्धां आवडेनासं होतं. एवढ्या चिंतेचं कारण तरी काय, तें समजण्यासाठीं मी बाई आपली शिकस्त केली, पण सारी फुकट. अलीकडे वृत्ति पाहिली तर असं वाटतं कीं,

पद. (चाल–वाट बघत द्वारिं०)

जग उदास भासतसे पतिराया कां सगळें ।। सकल
भोग्यवस्तुहि कां विरस गमति तें नकळे ! ।। मन
चिंताग्रस्त असे स्थीरपणा नच उरला ।। प्रियवद-
नानंदचंद्र अवचित कां मावळला ! ।। १ ।।

आज स्वारी आल्यावर असं होण्याचं कारण विचारलं पाहिजे. (समोर पाहून) अगबाई, प्राणनाथ आलेच वाटतं इकडे. (उठून उभी राहते.)

(कामपाल प्रवेश करितो.)

भामिनी—(कामपालास आलिंगन देऊन बाजूस बसते.)

कामपाल—प्रिये, सर्व वर्तमान ठीक आहेना ?

भामिनी—प्राणनाथ, आपलं जें सुख किंवा दुःख तेंच ह्या दासीचं त्याहून कांहीं निराळं नाहीं.

कामपाल—पण तुझ्या सेवेमध्यें कोणत्याहि रीतीनें कमीपणा नाहीं ना ?

भामिनी—(किंचित् स्मित करून) हें काय विचारावं प्राणनाथ ! आपल्या चरणकृपेनं सर्व कांहीं अनुकूल आहे.

(क्षणभर विचार करून) हो पण, आपल्याला थोडं विचारायचं आहे.

कामपाल——प्रिये, खुशाल विचार. कांहीं शंका धरूं नको.

भामिनी——प्राणनाथ,

दिंडी.

वदनचंद्राची कांति मलिन भासे ॥
नेत्रकमला चांचल्य येइ कैसें ॥
काय चिंतेनें व्यग्र असे झालें ॥
चित्त अपुलें पाहिजे विदित केलें ! ॥ १ ॥

कामपाल——(हंसून) प्रिये, कसली ही भलतीच शंका घेतलीस ? तुला सांगून ठेवितोंः—

दिंडी.

जरी युद्धा पातला शौर्यशाली ॥
वीर समरीं जिंकीन अल्पकालीं ॥
शत्रुगर्वा जिरवीन भुजबलानें ॥
युद्धनैपुण्यहि सकल लोक जाणे ! ॥ १ ॥

भामिनी——प्राणनाथ, अशा उडवा उडवीन माझं समाधान व्हायचं नाहीं बरं.

कामपाल——ह्रा वेडे, अजून नाहीं का तुझी समजूत होत. बायकांची बुद्धि कोती असते ह्मणतात तें अगदीं खरेंच.

भामिनी——हें पहा प्राणनाथ, अशा लपंडावांनीं माझ्या संशयाचं निरसन नाहीं व्हायचं. अलीकडे आपली ही कावरीबावरी वृत्ति, मनाचा धरसोडपणा, विचाराची अस्थिरता पाहून माझी तर खात्री होत आहे कीं,

पद. (चाल—गुरु दत्त दिगंबर०)

नच शांति दिसे चित्ताला ॥ मम संशय सत्यचि

ठरला ॥ ध्रु० ॥ रक्तवर्ण हे नेत्र दिसोनी ॥ व्या-
कुल मन कां झालें ॥ कारण ' चिंता ' ऐसें वाटे॥
अन्य न किमपी मजला ॥ नच० ॥ १ ॥

कामपाल—(हंसून) प्राणप्रिये, खचित तूं आपली कांहीं तरी वेडी समजूत करून घेतली आहेस झालें.

भामिनी—हें पहा, आपण कितीहि छपवाछपवी केली, तरी तिचा कांहीं उपयोग नाहीं व्हायचा बरं.

कामपाल—प्रिये, राज्यकारभारामध्यें नेहमीं कांहींना कांहीं तरी विचार करण्यासारखे प्रश्न उत्पन्न होतच असतात त्यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं.

भामिनी—एकूण सध्यां कांहीं विचार करण्यासारखा प्रश्न पुढें आला आहे वाटतं. प्राणनाथ, मला सांगण्यास कांहीं हरकत नसेल तर समजण्याची इच्छा आहे.

कामपाल—प्रिये, तुला सांगायलाती हरकत कोणती ? सध्यां लढाईचा विचार चालला आहे.

भामिनी—अग बाई, एवढा कोण मोठा शत्रु उत्पन्न झाला आहे ! आणखी प्राणनाथ, लढाईचं तरी कारण काय ?

कामपाल—(एकीकडे आपल्याशीं) मोठीच अडचण आली ह्मणायची. असो; कशी तरी वेळ मारून नेली पाहिजे. (उघड) प्रिये,

पद. (चाल—वाहवा थोर तुं भूपाला०)

गर्वें मत्तचि जो झाला ॥ त्याचा नाशचि ठरलेला ॥ध्रु०॥
अंगदेशपति चंद्रसेन तो राज्यमदानें मजला ॥ अव-
मानुनियां सदा वागतो उन्मत्त बहू बनला ॥ धिःका-

रुनिं मम मंत्रिकरातें दुर्वचनानें केला ।। अपमान पहा ! महापराधी भोगिल तो शिक्षेला ।। गर्वं० ।।

भामिनी—प्राणनाथ, तर मग त्याच्याशीं मोठाच रणसंग्राम करावा लागणार.

कामपाल—प्रिये, यांत कांहीं विशेष आहे असें नाहीं. आह्मां क्षत्रियवीरांना रणसंग्राम हाच महोत्सव असतो कारण असें पहाः—

पद. (चाल —लगाकरजाई ०)धुमाळी .

सदा रणिं जावें ।। अति उत्तम यश मिळवावें ।। ध्रु० ।।
निजरिपुबल संहरण करोनी ।। विजय दुंदुभी झडे अनुदिनीं ।। जन्म सफलता तरिच हो जनीं ।। नातरी व्यर्थ वांचावें ।। सदा० ।।

भामिनी—प्राणनाथ, मित्रपणा हा स्त्रीजातीचा एक जन्मसिद्ध गुण असल्यामुळं लढाईच्या गोष्टी निघाल्या ह्मणजे किंनाहीं, कसंसंच वाटतें. (उद्विग्न होते.)

कामपाल—प्रिये, भिण्याचें कांहीं कारण नाहीं. स्वस्थ ऐस. माझें सामर्थ्य काय कमी का आहे ?

भामिनी—तसं नव्हे प्राणनाथ, उद्यां आपण युद्धास जाणारच पण या दासीची विनंति ध्यानांत असावी.

अंजनीगीत.

दावुनि अपुलें शौर्य पराक्रम ।। शत्रुबलाचें करुनी कंदन ।। युद्धीं ठेवा सावधानपण ।। मम प्रिय पतिराया।।१।

कामपाल—प्रिये, तूं अगदीं निःशंक रहा. आणखी तुला सांगून ठेवतोंः—

साकी.

बाहुबळानें जिंकुनि रिपुला वैभव त्याचें हरुनी ।।

सकल मनोरथ पूर्ण करिन मी न करीं चिंता
स्वमनीं ॥ क्षत्रिय वीराला ॥ युद्धोत्सव कीं प्रिय
असला ! ॥ १ ॥

असो; आतां रात्र फार झाली. तर चल विश्रांति घेऊं.

भामिनी—ठीक आहे प्राणनाथ.

(पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—राजवाड्याचा रस्ता.

(दोन हुजरे दोन बाजूनें येतात.)

जिवाजीराव—राम राम, मानाजीराव राम राम. आज लई दिसांनीं भ्याट झाली पगा. बरं कस काय संमद बराबर हैना?

मानाजीराव—संमदं बरं है पगा ! बर पन अजून आज तुह्मीं गच्च बसलाया हे कसकाय हे.

जि० रा०—कारं बाबा आज वाड्यामंदी काई गडबड सडबड हे वाटतं.

मा० रा०—तुह्मासनी न्हांई समजलं व्हय.

जि० रा०—खरंच सांगतुया पगा आंबाबाईच्यान अजुन-पुतर अमाला कांहींबी समजलं न्हाई, पर मानाजीराव आज येवढं गडबडीचें काम काय हे.

मा० राव०—आज राव काय इचारता, मोठा दरबार हे, आन काय !

जि० राव०—काय झंगाता ! आज दरबार भरनार हाये होय तर मग राव मलाबी जरा जलदीन तीथं जायाला व्हवं!

पर मानाजीराव, आज मंदीच दरबार भरनार हे याच कारण तरी काय हे ?

मा० राज०—त्ये. बाबा आमाल्ली काईबी न्हाई समजत. पन याकादोघांच्या तोंडानं म्यां ऐकलं हे. कोना राजाबराबर लढाई करन्याचा इचार होनार हे !

जि० राव०—(हिरमुसलें तोंड करून) नगर बाबा, ह्या लढाई आन मारामारी करता करता लई ईट आलाया.

मा० राव०—वाहवार सुर सिपाई लई चतुर हायेस किर. अर, दोन हात पट्याच दाखवल्याबिगर कुठं काम होत असतंका व्हय ?

जि० राव०—तसं न्हव हो, मानाजीराव. पर झंगतो आज साराजनमभर लढाई करता करता जीव अगदीं बेजार झालाया पगा. पर आतां तरी घरामंदीं चार दोन दिवस बसुन सुखानं मिठभाकार खाईन झंगालो होतो. पर ते कुठं हे आमच्या नशिबामंदी !

मा० राव०—जोंवरी आपल्या धन्याची चाकुरी करायाची हे तीथपोतर त्याची कामगिरी करायास्नी नगका ?

जि० राव०—(जरा ऐटीनें) मग आमची कुठ नाहे ? चला तर बिगी बिगी तुह्मी आपल्या कामाला लागा. आह्मींबी आपल्या कामास्नी जातो.

(दोघे दोन बाजूनी जातात.)

प्रवेश ४ था.

स्थळ—राजदरबार.

(कामपाल राजास वंदन करून सर्व सरदार, मानकरी, प्रधान आपापल्या जागीं बसतात.)

कामपाल—प्रधानजी, सेनापते, तसेंच सर्व मानकरी व सरदार लोकें हो,

साकी.

अंगदेशचा चंद्रसेन तो गर्वमत्त बहु झाला ॥
बाहुबलानें जिंकुनि समरीं शासन करणें त्याला ॥
सैन्यासह जावें ॥ तयाला बांधुनि आणावें ॥ १ ॥

प्रबुद्धि प्रधान—आज्ञा महाराज, हुकुमाप्रमाणें तयारी ठेवतों.

शूरसेन—पण महाराज, एवढी कडक शिक्षा देण्यासारखा त्याजकडून अपराध तरी काय घडला आहे.

कामपाल—(रागानें) त्या गर्वोन्मत्त चंद्रसेनानें माझा अक्षम्य अपराध करून सर्वस्वी अपमान केला आहे.

शूरसेन—परंतु महाराज, तो राज्यारूढ होऊन फार अवधीसुद्धां झाला नाहीं.

कामपाल—शूरसेना, यौवनमदानें धुंद झालेल्या त्या चंद्रसेनाचें एकेक नीच कृत्य पाहून माझ्या अंगाचा संताप होऊन गेला आहे. असें पहा:-

पद- (राग जोगी, ताल धुमाळी.)

जमका अजब तडाका बे, या चालीवर.

माझें बल जरि ओळखितो ॥ मग कां वैर मनीं
धरितो ॥ ध्रु० ॥ राज्यपदारुढ होते समयीं मजसि
कैसा विसरे तो; ॥ करभारहि नच देई सगळा
बघुनि कोप मज चढतो. ॥ माझें० ॥ १ ॥

प्रबुद्धि—महाराज, चंद्रसेनानें अक्षम्य अपराध केला खराच. तेव्हां, त्याचें शासन करणें अवश्य आहे; कारण,—

दिंडी.

ज्वलित अग्नीला स्पर्शितो न कोणी ॥
भस्मपुंजातें जन मनीं न आणी ॥
मान हेंचि असे श्रेष्ठ वित्त लोकीं ॥
मानशून्य जना कोणि नादरा कीं ! ॥ १ ॥

शूरसेन—प्रधानजी, आपलें ह्मणणें खरें आहे. परंतु मला वाटतें, आतां राज्याभिषेकाचा समारंभ तर होऊन चुकलाच. तेव्हां प्रथम एकदां सामोपचारानें समजूत देऊन पहावी.

धनदास सेनापती—महाराज, शूरसेनाचें हें भाषण आपल्या अमर्याद वैभवाला मुळींच शोभत नाहीं; कारण कीं,

साकी.

अपमानोद्भव दुःख न मनुजा सहन कधींही होतें ॥
अपमानाचा सूड उगविणें हेंचि योग्य कीं दिसतें ॥
मान जगीं नसला ॥ मग तो पृथ्वीपति कसला ! ॥ १ ॥

कामपाल—प्रधानजी, सेनापति, आपलें भाषण अगदीं खरें आहे. एकदां मनुष्याचा अपमान झाला, ह्मणजे त्याला मरणप्राय दुःख होऊन त्याच्या अंतःकरणांत क्रोधाग्नीचा संचार होतो; तो शांत होण्यास सूड उगविणें हेंच काय तें मुख्य साधन आहे.

शूरसेन—महाराज, अपमानामुळें मन प्रक्षुब्ध होतें, हें खरें पण उच्छृंखल मनोवृत्तींच्या स्वाधीन न होणें हेंच विचारी पुरुषाचें लक्षण आहे; ह्मणून सारासारविवेकानें वागून आत्मसंयमन करावें.

कामपाल—(क्रोधानें) शूरसेना, पुरेकर हें वाक्पांडित्य. आपलें वक्तृत्वतेज दाखविण्याची ही वेळ नव्हे या वेळीं शस्त्रतेजच चमकलें पाहिजे.

शूरसेन—(लीनतेनें) महाराज, आपण थोर विचारी आहांत. मी आपल्या राज्याचा खरा हितचिंतक असल्यामुळें माझ्यानें योग्य विचार सुचविल्यावांचून राहवत नाहीं. ह्मणून ह्मणतों:—

पद. (चाल—या विरहा कां भीसी)
रागिणी भैरवी, ताल त्रिताल.

अधिन मना नच व्हावें ।। ध्रु० ।। मनोनिग्रहें सावध
वागुनी आत्मसुखासि वरावें ।। अधिन मना० ।।
मन चंचल हें वायुगतीसम।।त्या बहकूं नच द्यावें ।।
अधिन० ।। २ ।। चित्तवृत्तिला वश होउनि कां ।।
दुःखबीज पेरावें ।। अधिन मना० ।। ३ ।।

कामपाल—(संतापानें) शूरसेना, पुरे कर ही बडबड. ही उपदेश करीत बसण्याची वेळ नव्हे. माझें मन त्वेषानें भडकून गेलें आहे. त्यांत आणखी भर घालूं नको.

शूरसेन—(एकीकडे आपल्याशीं) 'बुद्धिः कर्मानुसारिणी' असें जें ह्मणतात, तें कांहीं खोटें नव्हे. एवढा हितोपदेश केला, परंतु कांहीं उपयोग नाहीं. खुशाल भोगा आपापल्या दुष्कर्मांचीं फळें ! (उघड) महाराज, आपल्या आज्ञेपुढें माझा निरुपाय आहे. परंतु, मी आपलें कर्तव्य केलें आहे.

कामपाल—(तिरस्कारानें) प्रधानजी, सेनापती, शूरसेनाच्या भाषणाकडे लक्ष्य देण्याचें कांहीं कारण नाहीं. ह्या अल्पवयी, उतावीळ वाक्पटूला राज्यकारस्थानें तीं कशीं समजणार. असो; उदयीक सैन्यासह जाऊन त्या गर्वोन्मत्त

चंद्रसेनाच्या नगरास वेढा घालण्याची सिद्धता ठेवून युद्धास आरंभ करा.

प्रबुद्धि—महाराज, आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवितों.

सेनापति—महाराज, आपणाला कांहीं चिंता नसावी. चंद्रसेनाला जिंकून कैद करून आणितों पहा !

(नंतर सर्व सरदार प्रधान वगैरे कामपालास वंदन करितात व दरबार खलास होतो.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—राजमार्ग.

(प्रबुद्धि प्रधान व शूरसेन बोलत प्रवेश करितात.)

प्रबुद्धि—पण शूरसेन, तुह्मी एवढ्या उतावीळपणानें आपल्या महाराजांना कां सोडून जातां ?

शूरसेन—प्रधानजी, त्याचें कारण तुह्मांला सांगण्यासारखें नाहीं.

प्रबुद्धि—(आग्रहानें) कांहीं हरकत का आहे ?

शूरसेन—प्रधानजी, माझी अशी इच्छा आहे कीं, तें अगदीं गुप्त असावें.

प्रबुद्धि—शूरसेन, मी हातावर हात देऊन सांगतों कीं, तुमचा उद्देश कोणालाही सांगणार नाहीं. (टाळी देतो) हं सांगा पाहूं आतां.

शूरसेन—(एकीकडे आपल्याशीं) आतां मात्र निरुपाय

झाला पण याच्या हातून माझें काय अहित व्हावयाचें आहे? (उघड) प्रधानजी,

पद. (चाल—मारुं कसे यांना०)

संग नको असला ॥ क्षणही ॥ ध्रु० ॥ न्यायनीति
ना धर्महि जेथें ॥ वास तिथें न भला ॥ क्षणही०
॥ १ ॥ उपदेशाला तिरस्कार हें ॥ उत्तर खासें
मिळतें ॥ पळहि नच रुचे आश्रय तैसा ॥ जो नर
मानी त्याला ॥ क्षणही० ॥ २ ॥

प्रबुद्धि—(चपापून) ह्मणजे, हें काय तुह्मी ह्मणतां शूरसेन? महाराजांनीं तुमचा कांहीं अपमान का केला आहे.

शूरसेन—प्रधानजी, असलें बळेंच वेड कशाला पांघरतां?

प्रबुद्धि—शूरसेन, मला कांहीं माहीत नाहीं. खरेंच सांगा.

शूरसेन—काल दरबारामध्यें होतां कीं नव्हतां?

प्रबुद्धि—होय होतों; मग पुढें काय झालें?

शूरसेन—प्रधानजी, त्यावेळीं चंद्रसेनावर स्वारी करण्यासंबंधानें मी प्रतिकूल मत दिलेलें महाराजांस न आवडल्यामुळें त्यांनीं माझा धिःकार केला, त्याचें स्मरण आहे का गेलें?

प्रबुद्धि—(किंचित् हंसून) अः जाऊं द्याहो ! त्यांत काय आहे?

शूरसेन—प्रधानजी, शोभा झाली ती थोडीच ह्मणायाची तर!

प्रबुद्धि—हें पहा शूरसेन, अजून तुमचें वय लहान, राज्यकारणाराचें आणखी राजनीतीचें तुह्मांला आनुभविक ज्ञान नाहीं ह्मणून तुह्मांला तसें वाटतें.

शूरसेन—ह्मणून धडधडीत अन्यायानें घडणाऱ्या गोष्टींना नंदीबैलासारखी मान हालवणें हा कोठला शहाणपणा ?

प्रबुद्धि—हें पहा शूरसेनः—

दिंडी.

समय बघुनी वागणें राजलोकीं ॥
राजनीतीचें तत्व हें असे कीं ॥
मधुरवचनानें कार्यभाग होतो ॥
सदुपदेश परी क्लेशमात्र देतो ! ॥ १ ॥

शूरसेन—(हंसून) वाहवा ! प्रधानजी, आतां मात्र मला राजनीतीचें परम रहस्य समजून आलें कीं,

पद. (चाल—स्वार्थी प्रीति मनुजाची०)

स्वामीवृत्तिवश होवो ही मती ॥ ध्रु० ॥ व्यर्थ स्तुति करुनी जो वागे ॥ उत्तम त्या ह्मणती ॥ स्वामी- वृत्ति० ॥ १ ॥ स्वार्थ साधुनी स्वामिहित करी ॥ मध्यम त्या ह्मणती ॥ स्वामीवृत्ति० ॥ २ ॥ स्वामि हितार्थचि उपदेश करी ॥ दुष्ट अधम ह्मणती ॥ स्वामीवृत्ति० ॥ ३ ॥

प्रबुद्धि—(रागानें) शूरसेन, ह्या तुमच्या अविचाराचा पुढें तुह्मांला पश्चात्ताप झाल्यावांचून राहणार नाहीं.

शूरसेन—प्रधानजी, मला तुमच्या राज्याशीं आतां काय काम करायचें आहे. या पुढें माझा सहायकर्ता परमेश्वर आहे.

प्रबुद्धि—(क्रोधानें) जा धरा तर मग आपला मार्ग. तुझ्या सारख्या दुराग्रही मनुष्याची काय समजूत व्हायची आहे. (जातो.)

शूरसेन—राजे लोकांची प्रीति चंचल असते, असें

ह्मणतात त्याचा मला प्रत्यक्ष अनुभव आल्यावर येथें राह-ण्यांत काय अर्थ ? कोठें तरी देशांतर करून तीर्थपर्यटण करावें हातर माझा निश्चय ठरलाच. पुढें काय घडेल तें खरें. (क्षणभर विचार करून) त्या बिचाऱ्या चंद्रसेन राजावर स्वारी करून त्याचा छळ करण्यामध्यें कामपालाचा कांहीं तरी अंतःस्थ उद्देश असावा असा संशय येतो. पण कांहीं झालें तरी शेवटीं,

साकी-

ईशकृपेनें सज्जनरक्षण होउनियां दुष्टांतें ॥
दुष्कर्मांच्या कडू फळांचें सेवन भागचि पडतें ॥
यास्तव वागावें ॥ सुमार्गें हरिपद पावावें ॥ १ ॥

(जातो.)

तिसरा अंक समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ—महाल.

(पडदा उघडतांच, मोहना राणी कोंचावर बसली आहे, जवळ दोन दासी हार तुरे करीत आहेत असें दिसतें.)

मोहना—चंद्रिके, तुझा तो मोगरीच्या फूलांचा गजरा झाला नाहीं का अजून ?

चंद्रिका—झाला बाईसाहेब, हें आतां शेवटचंच फूल गुंफून पुरा करून देतें.

मोहना—बरं मालिनी, तू तो चमेलीच्या फुलांचा हार केव्हांची करीत बसली आहेस. अजून नाहीं का झाला तो ?

मालिनी—होय बाईसाहेब. बहुतेक पुरा होत आला आहे. पण आजः—

मोहना—(मध्येंच स्मित करून) पण काय ? कांहीं सबब सांगायची आहे वाटतं. खुळी कुठली.

मालिनी—मी तर आपली वेडी खरीच, पण अजून स्वारी इकडे येण्यास.—

मोहना—(मध्येंच रागावल्यासारखें दाखवून) हं पुरे पुरे समजलें हो. कांहीं तरी सबबी सांगून कामांत चुकवाचुकव करण्याची आपली जशी कांहीं खोडच लागून गेलेली.

चंद्रिका—बाई मालिनी, तुला नाहीं समजत. अगे,

प्रीतीचं हें लक्षणच कीं, प्रणयी जनांचं मन परस्परांच्या प्राप्तीसाठीं अगदीं उत्कंठित असतें; आणखी वास्तविक असें असण्यांत कांहीं नवल नाहीं बरं का.

मोहना—(रागाचा आविर्भाव आणून) हं चंद्रिके, जीभ आटप. आज भारीशी चुरुचुरु बोलायला लागली आहेस. (समोर पाहून) अगबाई, स्वारी आलीच इकडे (उठून उभी राहते.)

(दासी लगबगीनें हारतुरे पुरे करून ताटांत भरून ठेवितात, व दोघी दोन बाजूंनीं निघून जातात.)

चंद्रसेन—(प्रवेश करून आपल्याशीं) अहाहा ! या विलासमंदिरांत प्रवेश करितांच मला असा भास होत आहे कीं,

पद. (चाल—मूर्तिमंत भीति उभी०)

मूर्तिमंत चंद्रकला या स्थलीं प्रकाशली ॥
तारकाप्रभानुषक्त नयनहारि शोभली ! ॥
दिव्यकांति काय रती प्राप्त येथ जाहली॥
स्वर्गलोक सोडुनि कीं तडित्प्रभाच पातली ! ॥ १ ॥

(पुढें होऊन मोहनेचें चुंबन घेतो.)

मोहना—(लज्जेनें किंचित् तोंड फिरवून) पण प्राणनाथ,

पद. (चाल—सदर.)

चंद्रिका रविप्रकाश योगसमय पावली ॥ हर्षदा
तरीच होय अन्यथा न शोभली ॥ मेघचंचलासु-
युती शोभते पहा ! भली ॥ यामिनि विधुवियुक्त
हास्यमुख न पाहिली ! ॥ चंद्रिका० ॥

चंद्रसेन—(किंचित् हंसून) शाबास प्रिये, एकूण माझ्या शंकेचें चांगलेंच समाधान केलेंस ह्मणायचें तर.

मोहना––प्राणनाथ, मजकडेस काय आहे ? आपण शंकाच घेतलीत मग समाधान नको का करायला ?

चंद्रसेन––स्त्रीजात मोठी धूर्त आणि समयसूचक असते असें ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं. असो; पण प्रिये, तूं अशी उभी किती वेळ राहणार ? मला वाटतें तूं.

खरोखरः––

पद. (चाल–चिदानंद कंद नंद०)

कोमल निजतनुलतिका श्रमविशी प्रिये ।। विनय-
भार वाहुं नको जवळि बैस ये ।। ध्रु०।।शिणविशि कां
चरणकमल ।। करुनि दूर भीतिपटल ।। हर्षभरें
अधरामृत पान करूं सखये ।। कोमल० ।। १ ।।

(चुंबन घेतो.)

मोहना––(विनयानें जवळ बसते.) प्राणनाथ, आपणाला कांहीं विचारावं असं मनांत येतं, पण धीर होत नाहीं.

चंद्रसेन––प्राणप्रिये, निःशंक विचार. मनामध्यें कोणत्याहि प्रकारची आशंका आणूं नकोस.

मोहना––प्राणनाथ, कांहीं विशेष विचारावयाचं आहे असं नाहीं. परंतु अलीकडे आपली एकंदर स्थिति पाहून मला वाटतें–

पद. (चाल–बलसागर तुह्मी०)

घर्मबिंदु हे वदनिं दाटले नयनां चंचलता ।। भासे
चित्तीं वास करितसे कांहिं तरी चिंता ।। ध्रु० ।।
थोर पराक्रम अपार वैभव असुनी कां श्रमतां ।।
क्षणभरि नसते कधिं विश्रांती स्वस्थपणें चित्ता ।।

अप्रतिहत चालते सदोदित महिवरती सत्ता ॥
सांगा मजला विवंचना कां मग कसली करितां ॥१॥

चंद्रसेन—प्रिये, परमेश्वरानें प्रत्येक मनुष्यमात्राला कांहीं तरी कर्तव्यकर्म लावून दिलेलें आहे. कोणी कसें वागावें, काय करावें, काय न करावें याविषयीं शास्त्रामध्यें मर्यादा ठरवून दिलेल्या आहेत. त्यांना अनुसरून वागण्यामध्येंच सर्वांचें खरें कल्याण असतें समजलीस.

मोहना—पण झटलं झणजे राजे लोकांना कांहीं कमी नसतें त्यांना वास्तविक एवढे परिश्रम करण्याची गरज नाहीं.

चंद्रसेन—प्राणप्रिये, या संबंधानें तुझें अज्ञान दिसून येतें. थोडा विचार केलास, झणजे तुला समजून येईल कीं,—

पद. (चाल—नाहिं सुभद्रा या वार्तेतें)

कर्तव्यानें नियमित अवघें जग हें जाणावें ॥ धर्म-
नीतिसत्पथ अनुसरुनि सावध वागावें ॥ ध्रु० ॥
राया रंका एकचि आहे सुमार्ग उन्नतिचा ॥ परि
राजकर्म हें अवघड आहे संग्रह दुःखांचा ॥ सकल
जनांचें रक्षण करणें उद्यम भूपाचा ॥ जनसंतोषा
सदा ठेवणें सुलभ न मानावें ॥ कर्त० ॥ १ ॥

मोहना—(खिन्न होऊन) प्राणनाथ, यावरून तर मगः—

पद. (चाल—भगवती नवस तव०) चंद्रहास.

जगिं कुठेंच सुख मज न दिसे ॥ या जगिं कुठेंच
सुख मज न दिसे ॥ क्षणहि नसे ॥ भ्रमचि असे॥

ध्रु० ।। दुःख भोगणें कष्ट करोनी।। दैन्यचि अवघें पाठिमागुनी ।। अनंत दिगंत छळीतसे ।। मनांत काळजी सदा वसे ।। जगिं कुठेंच० ।।

चंद्रसेन—प्रिये, अशी खिन्न कां होतेस ? असें पहाः—

पद. (राग–मालकंस, त्रिताल.)

चाल–तेचि पुरुष दैवाचे.

कारण सुखदुःखांचें ।। आपुलेंचि मन साचें।।ध्रु०।।
मायामय हा मोहपसारा ।। बहुविधदुःखाकुलकीं सारा ।। वागुनि धैर्यें भवनिधि उतरा ।। वचनचि संतांचें ।। कारण० ।। १ ।।

मोहना—(उल्हासानें) खरोखर केवढी धन्य मी ! प्राणनाथ, आपल्या सहवासानें असलें बोधामृत प्राशन करण्याची सुसंधि अशाच थोर गुणांमुळें मला प्राप्त झाली.

चंद्रसेन—प्रिये, तुझ्या ह्मणण्याचा आशय कळला नाहीं !

मोहना—प्राणनाथ, सांगतें इकडे लक्ष्य असावें.

पद. (चाल–भूपती खरे ते)

मत्पिता सद्गुणी परि न निश्चयी ह्मणुनी।।मत्प्राप्ति लोभ धरि कामपालनृप स्वमनीं ।। ध्रु० ।। करितसे मागणी आग्रह धरुनी मजला ।। परि चातुर्यें मम बेत तयाचा फसला ।। अति दुष्ट ह्मणुनि तो जगीं असे हो ठरला ।। हरिकृपा होउनी प्रसंग अवचित टळला ।। चा० ।। आपुले चरण-लाभानें ।। तुष्टलें ।। चित्त हें स्मरण दुःखाचें लोपलें ।। साफल्य खरें जन्माचें ।। जाहलें ।। स्तुतिपात्र

गुणांची कीर्त्ति येउनि श्रवणीं ।। मम तातें पद हें
दिधलें मजलागोनी ।। मदिप्ता० ।।

चंद्रसेन—प्रिये, एकूण तो दुष्ट कामपाल तुझ्या प्राप्ती-विषयीं उत्सुक होता तर. मोठा राज्यलोभी, अविचारी आणखी मत्सरी आहे तो.

मोहना—प्राणनाथ, माझ्या बाबांना त्याच्या त्या सामर्थ्याचा नि वैभवाचा केवढा धाक वाटत होता. पण, आईच्या शहाणपणामुळेंच तो अमंगळ प्रसंग टळला.

चंद्रसेन—प्रिये, एक ईश्वराची कृपा असली, ह्मणजे प्रतिकूळ गोष्टीसुद्धां अनुकूलच होऊं लागतात, कारण असा सिद्धांत आहे कीं,

साकी.

भक्तजनांचें रक्षण करुनी स्थिरचरव्यापक हरि तो ।।
दावुनि अपुली अगाध करणी शत्रुबला संहरि तो ।।
निष्ठा त्याजवरी ।। असावी सर्वकाल सारी ।। १ ।।

बरें, चल आतां विश्रांति घेऊं.

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—(शहराची वेशी).

धनदास सेनापति—(आपल्याशीं) मध्यरात्रीचा समय. चोंहोंकडे कसें सामसूम होऊन गेलें आहे. ही अशी शांत व

भयाण वेळ चोरांना आणखी दुष्टलोकांना आपले बेत साधण्यास उपयोगी पडते. (क्षणभर विचार करून) असो; महाराजांच्या आज्ञेप्रमाणें चंद्रसेनाच्या राजधानीमध्यें प्रवेश तर झालाच. (विस्मयानें) काय ह्या चंद्रसेनाचे नगररक्षक विश्वासु आणखी राजनिष्ठ. द्रव्याला किंवा व्यसनसामग्रीला तिळमात्र वश न होतां बिच्याऱ्यांनीं आमच्या शस्त्रांना प्राण बळी दिले. याचें नांव स्वामिभक्ती. खरोखर धन्य धन्य असा राजा आणि त्याची प्रजा. (सैन्यासह स्वार येतात त्यांस) सैनिक हो, हीच त्या चंद्रसेनाची राजधानी. चल गुप्तपणें राजवाड्याला वेढा घालूं या. आपापल्या कामांत हुशार रहा आणखी,

पद. (चाल–भंजनपर्वा न करी पर्वा०)

शोधा पकडा बांधा झडकरि चंद्रसेन तो कुणीकडे ॥
बसला असेल तेथुनि हुडकुनि बांधुनि आणा शीघ्र
पुढें ॥ ध्रु० ॥ हरूं राज्य त्या करूं शासना झडकरि
नेऊं येथोनी ॥ काय कथा सैन्याची जिंकूं क्षणामध्यें
एका लढुनी ॥ नृपतीसन्निध भुज बांधोनी करूं उभा
त्या नेवोनी ॥ गर्वांधातें शिक्षा देणें काम असे हें
नृपतीकडे ॥ शोधा० ॥ १ ॥

सैनिक—चला आमची तयारी आहे.

सेनापती—हें पहा, अगदीं गडबड करूं नका. निमुटपणें राजवाड्याला वेढा घातला ह्मणजे आपलें काम झालेंच. चला तर मग.

(सर्व सैन्य शिस्तवारीनें निघून जातें.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—राजवाडा.

(राजवाड्याला सैन्याचा गराडा पडला आहे. जिकडे तिकडे गर्दी उसळलेली आहे असें पाहून चंद्रसेन त्वरेनें पुढें येतो त्यास कामपालाचे सैनिक पकडूं लागतात.)

चंद्रसेन—(उद्विग्न होऊन) अरेरे ! केवढा अनर्थ हा ! हरहर हे दैवा, मजवर असा हा अचानक घाला कोठून आला ! (क्रोधानें) ही वेळ शोक करीत बसण्याची नव्हे. (चवताळून) चला दुष्टांनो, मला निःशंक बांधूं पहातां काय?

कामपाल—(पुढें होऊन) छीः मूर्खा चंद्रसेना, तुला सोडून देण्याकरितां आह्मी येथें आलों आहों काय ? (सैनिकांस) पहातां काय ? करा याला चतुर्भुज.

चंद्रसेन—(क्रोधानें हात हिसडून) थांबा चांडाळांनो, तुमच्या ह्या नीच कृत्याचें योग्य शासन करितों. दुष्टा कामपाला,

पद. (चाल—अधम क्षिति पालिका०)

सिद्ध हो सिद्ध हो दुष्ट मूर्खा ॥ वाटली नच तुला ॥ पाप शंका ॥ ध्रु० ॥ धर्मनय सोडुनी चोरसम येउनी ॥ वंचिशी कां वृथा प्राणवित्ता ॥ वीर नसशी खरा डाग क्षत्रियकुला ॥ लाविशी नरपशो कुलकलंका ॥ सिद्ध हो० ॥ १ ॥ भ्रष्टकृति आचरुनि जल्पसी कां वृथा ॥ दावितों शौर्य मी सकल लोकां ॥ तीक्ष्ण शस्त्रें तुला दंडुनी ॥ येथुनी धाडितों बध कसा मृत्युलोका ॥ सिद्ध हो० ॥ १ ॥

कामपाल—यावेळीं मला धर्म अधर्म, न्याय अन्याय कांहीं एक दिसत नाहीं. मूर्खा, काळाच्या दाढेंतला प्राणी सुटून जाईल का ?

चंद्रसेन—(त्वेषानें) अरे क्षत्रकुलांगारा, अधमा कामपाला, तुझ्या पापाचे घडे आतां भरत आले आहेत. हें घे तुझ्या दुष्ट आचरणाचें फळ. (कामपालाच्या अंगावर तुटून पडतांच सेनापती व सैनिक त्यास पकडून बद्ध करितात.)

चंद्रसेन—(दुःखाकुल होऊन) हर हर हे परमेश्वरा, या वेळीं माझा प्राणमित्र धैर्यशील कोठें गेला ? माझ्या प्राणप्रियेची अवस्था काय झाली असेल ! ती हें दुःखकारक वर्तमान ऐकून प्राणत्यागहि करील ! वैकुंठनायका, काय हा दारुण प्रसंग ! प्रभो,

पद. (चाल—धांव धांव धांव अतां०)

धांव धांव पाव शीघ्र हे रमावरा ॥ दुष्ट आह्मां
गांजिति हे सदय मन करा ॥ ध्रु० ॥ शस्त्रहीन
मज धरिती ॥ राज्य हरुनि ताप देति ॥ प्राणांतें
काय करिति ॥ न कळे हें मज संप्रति ॥ करुणाकर
संकटिं या देइं मज करा ॥ धांव धांव० ॥ १ ॥

कामपाल—सेनापते, याला घेऊन चला, आणि कारागृहसाम्राज्याचा पट्टाभिषेक करा !

चंद्रसेन—(जातां जातां) शिव शिव ! काय ही दुर्दशा! जगदीशा, कसारे निष्ठुर झालास ? तुला माझी करुणा येत नाहींका ? शंकरा,

पद. (चाल—मदन दहना उमारमणा०)

कमलनयना उमारमणा नसे आह्मां कुणी वाली ॥
शरण तुजला असें आलों करा सुदया विपत्कालीं ॥

अहा ! ऐशा कठिण समयीं नसे आह्मां कुठें थारा ॥ प्रभो, रक्षीं चरण शरणा विनंती ही मला तारा ! ॥ १ ॥

(कामपालानें खुणा करितांच सेनापती व सर्वसैनिक चंद्रसेनास घेऊन जातात.)

कामपाल—(हंसून) अहाहा ! धन्य धन्य आज मी ! माझा बहुतेक कार्यभाग सिद्धीस गेलाच. पाहतों आतां ती चारुगात्री मनमोहना कशी प्राप्त होत नाहीं तें.

पद. (चाल—अंजन पर्वा न करी पर्वा०)

साधुनि आतां पूर्ण मनोरथ घेतों सत्वरि जावोनी ॥
अपमानाचा सूड उगविला राज्य घेतलें जिंकोनी॥
मदनमंजरी सुंदरि मजला सोडुनि जाइल ती कोठें ॥ काळाचाही काळ पातला लावुनि देइन त्या वाटे ! ॥ १ ॥

जाऊन पाहतों आतां ती सुंदरी कोठें आहेती—
(आवेशानें निघून जातो.)

(दोन दासींसह मोहना शोक करित येते.)

मोहना—(धरणीवर अंग टाकून)

पद. (चाल—अजि शेवटचा लाभ०)

अहा ! दैवाची गति नकळे मुळिं मजला ॥ मम मानसिं धीर न उरला ॥ किति दुष्टानें घोर कपट हें केलें॥ अति निंद्य कर्म आचरिलें ॥ मम प्राण न कां हे जाती ॥ दुःखें अनेकचि बघती ॥ किति सोसूं मी क्लेश अशा समयाला ॥ त्यागीन मी प्राणाला ॥ अहा० ! ॥ १ ॥

हरहर हे परमेश्वरा, या दीन अबलेवर केवढा तरी हा भयंकर प्रसंग आला ? (मूर्च्छित होते.)

(दासी वारा घालून सावध करितात.)

मोहना—सख्यांनो, कशाला सावध करतां ? देवाला माझी करुणा नाहींना येत ? मला जगून तरी करायचं आहे काय ?

चंद्रिका—बाई साहेब, हें काय बरं असं करावं ? इतकं कांहीं घाबरायला नको. महाराज, लौकरच पराक्रमानं सुटून येतील.

मोहना—हा वेडे ! पण तेथपर्यंत हे प्राण राहतील ना ?

(पुनः मूर्च्छित होते.)

मालिनी—(सावध करून) बाई साहेब, असं काय बोलावं ? धीर सोडूं नये.

मोहना—(सद्गदित होऊन) सख्यांनो, मला कांहीं आतां जगायची आशा नाहीं. ही माझी एवढी खुणेची आंगठी तिकडे देण्यासाठीं ह्मणून प्रधानजीच्या जवळ देऊन ठेवा ह्मणजे झालें.

चंद्रिका—बाई साहेब, त्याविषयीं कांहीं काळजी नको.

(इतक्यांत ह्यातांत तरवार घेऊन क्रूर मुद्रा धारण केलेला कामपाल राजा प्रवेश करितो; त्यास पाहून दासी भीतीनें घाबरून दूर जाऊं लागतात.)

मोहना—(भयानें गांगरून) चंद्रिके, अगे मालिनी, मला सोडून कोठें चाललां ? (त्यांच्या मागोमाग जाऊं लागते.)

कामपाल—(पुढें होऊन) प्राणसखे, तुझें हें अलौकिक लावण्य कामपालावांचून व्यर्थ होय. तेव्हां:—

मोहना—(मध्येंच) दुष्टा कामकिंकरा, कांहीं तरी विचार कर. कामांध होऊं नको. मूर्खा,

पद. (चाल—दैवयोग दुर्विपाक०)

पापकृत्य आचरुनी निंद्य होशि कां ।। शंका तुज
पापाची मनिं न येइ का ! ।। ध्रु० ।। आजवरी
थोर मुनी भ्रष्ट जाहले ।। कामातें वश होउनि
पुण्य वेंचिलें ।। अजुनि तरी सावध हो तुज न हें
भलें ।। दुष्ट हेतु धरुनि मला व्यर्थ छळिशि कां ।।
पापकृत्य० ।। १ ।।

कामपाल—सुंदरी, या वेळीं मला उपदेश नको. माझे मनोरथ पूर्ण करून माझ्या अपार संपत्तीचा सुखानें उपभोग घे.

मोहना—आग लाव मेल्या त्या तुझ्या संपत्तीला. मूर्खा? असलें अभद्र भाषण करण्यास तुला शरम कशी वाटत नाहीं,

कामपाल—प्रिये मोहने, यांत माझा कांहीं अपराध नाहीं हा सगळा मदनाचा प्रताप आहे. सुंदरी खरोखर सांगतों:—

पद. (चाल—अनुरूप तुझ्या स्वरूपाला०)

देखुनी तुझ्या रूपाला ।। हा दास असे भ्रमलेला ।।
करिं तृप्त देउनी याला ।। तव अधरामृत पानाला।।
तुजवीण उदासचि मजला ।। जग भासे कथितों
तुजला ।। तरिं होइं सखे अनुकूल ।। हरीं मम
शूल ।। मनीं असलेला ।। प्राणदान दे मजला ।।
देखुनी० ।। १ ।।

(पायां पडूं लागतो.)

मोहना—(तिरस्कारानें)

पद. (चाल—गांजितां मला कां नाथा)

तूं खराच पापी दिसशी।।नीचा, तुज शंका, कां नच

ये मज कशास तूं छळितोसी ।। ध्रु० ।। अवचित
गांठुनि परस्त्रियेला ।। गांजिशि कां मज ऐशी ।।
तूं खराच० ।। भ्रष्टाचरणें पापकृतीनें तूं नरकीं कां
पडशी ।। तूं खराच० ।। १ ।।

कामपाल—प्रिये मनमोहनें, तुझ्या ह्या उपदेशामृतानें माझे कर्ण तृप्त झाले. तसेंच आतां एकदां अधरामृतपानानें हे प्राण संतुष्ट कर. (जवळ जाऊं लागतो.)

मोहना— (संतापानें)

पद. (चाल–परि शिवा न लावी०)

न लावीं हात मला ।। दूर हो न लावीं हात मला
।। ध्रु० ।। चांडाळा तव वर्तन सगळें ।। पापयुक्त
अनिवार ।। न लावीं हात मला ।। दूर हो० ।।

कामपाल—(आर्जवानें)

प्रिये सुंदरी तव लावण्यें ।। होई मन हें गार ।। न
सोसे विरह मला ।। सुंदरी न सोसे विरह मला ।।

(पुढें होतो इतक्यांत तरवार खालीं पडते, ती मोहना चट्कन उचलून घेते.)

मोहना—(त्वेषानें) मूर्खा अधमा सांभाळ आतां.

पद. (चाल–कंठ चर चर०)

कंठ चरचर चिरुनि टाकिन करिन शिक्षा ही
पहा ! भूवरी नच कोणि ऐसा घोर पातकि तूं
महा ।। दाखवीतें यम पुरीची वाट तुजला भोग
तीं ।। पापकृतिचीं फळें कटुतर तेथ तुज जीं
चारिती ! ।। १ ।।

कामपाल—(निरुपाय झालासें पाहून) सुंदरी, मी तुला सर्वस्वीं शरण आलों आहें. माझी उपेक्षा करूं नको. (पायां पडूं लागतांच मोहना क्रोधानें त्याला झिडकारून लोटून देतांच तो जमिनीवर पडून मूर्च्छित होतो.

मोहना—या वेळीं सर्व नगर शत्रु मय झालेलें दिसतें. तेव्हां येथें राहणें बरें नव्हे. पुढें काय होईल तें होवो. जगन्निवासा कैलासपते, तुझ्याच कृपेचा मला आधार आहे. तेव्हां,

पद. (चाल-प्रभो सदा सुखांत ठेव०)

प्रभो उमावरा हरा सदैव शंकरा ।। कृपा करा नसेचि अन्य मजसि आसरा ।। ध्रु० ।। वंदितें पदांबुजासि मुक्त मज करा ।। दुःख सागरांतुनी हि हे परात्परा।। मला न सोसवे अनर्थ हा महेश्वरा ।। मजसि भेटवीं विभो सुशीघ्र प्रियकरा ! ।। प्रभो० ।। १ ।।

(जाते.)

प्रवेश ४ था.

स्थळ—नगराबाहेरील प्रदेश.

(धर्मदक्ष व धैर्यशील बोलत बोलत प्रवेश करितात.)

धर्मदक्ष—धैर्यशीला, कालचक्र एकदां फिरलें म्हणजे केवढाले अनर्थ फार थोड्या अवधीमध्यें घडून येतात तें पाहिलेंस ना ?

धैर्यशील—खरेंच प्रधानजी, काल आपल्या महाराजांची झालेली दुर्दशा स्वप्नासारखी वाटते. एका दिवसांत किती भयंकर क्रांति होऊन गेली तरी.

धर्मदक्ष—धैर्यशीला, लोभ हा एक मोठा शत्रु आहे. मनुष्य एकदां त्याच्या आधीन झाला ह्मणजे त्याच्या हातून घोर कर्मे घडतात.

धैर्यशील—आणखी लोभाच्या जोडीला क्रोध किंवा मत्सर मिळाला ह्मणजे मग शक्तिमान् लोकांचे काय काय मनोव्यापार चालतात, व त्यांचा परिणाम गरिबांस किती जाचतो, तें नेहमीं पाहतच आहोंत.

धर्मदक्ष—ह्मणून काय झालें ? असा कोठें न्याय आहे काय ? कीं,

पद. (चाल—ब्राह्मण कन्या नव्हे०)

समर्थ ह्मणुनी बलवंतानें गरिबा बुडवावें ।।
तयाला अवचित फसवावें ।। ध्रु० ।।
शक्तिहीन कां ह्मणुनि त्याजला समूळ चिरडावें ।।
किंवा संकटीं बुडवावें ।।
दुःखसागरीं व्यर्थ कशाला लोटुनियां द्यावें ।।
तयाचें छळणहि मांडावें ।।
दीन ह्मणुनि कांअन्न जनांना धुळीस मिळवावें।।
अथवा मारुनि टाकावें ! समर्थ०।।१।।

धैर्यशील—प्रधानजी, आपलें भाषण खरें आहे. परंतु असें पहा:—

पद. (चाल—हा काळ एक टरला०)

जो स्वभाव बनलेला ।। जगीं तो कधीं नसे फिरला ।। ध्रु० ।। मागें सारुनि सर्व गुणांना स्वभाव ये पुढती ।। भूषणमंडित गर्दभ उत्तम हय कैसे बनती ।।पोटभरूला राजा केला सोडि न तो झोळी ।।

मोलिविक्या जरि कुबेर बनला फेंकिल का
मोली ।। कृष्णसर्प कधिं दुग्ध पिउनि तो सांडिल
का गरला ।। कोकिलसम कधिं गान करिल का
काक जरी नटला ।। जो० ।। १ ।।

धर्मदक्ष---धैर्यशीला, स्वभावाला औषध नसतें. तशांतून मनुष्याची बुद्धि पापाचरणाकडे लौकर प्रवृत्त होते; ह्मणूनच थोर सत्पुरुषांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं,

साकी.

कामक्रोधादिक षड्रिपु हे क्रूर भयंकर असती ।।
आयुष्याची हानि करोनी विफल जन्मही करिती ।।
वश न तयां व्हावें ।। जिंकुनी स्वाधिन ठेवावें ! ।।१।।

धैर्यशील---बरें पण प्रधानजी, कामपालाला आपल्यावर एवढी अकस्मात् स्वारी करण्याचें कारण काय असावें ?

धर्मदक्ष—धैर्यशीला,वास्तविक आमच्या राज्याशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. परंतु, त्याचा कांहीं तरी अंतःस्थ हेतु असला पाहिजे.

धैर्यशील---प्रधानजी, बरें स्मरण झालें. याच कामपाल-राजाची तसबीर वीरकांत महाराजाकडे गेली होती, आणखी तेथें ती नापसंत ठरली होती.

धर्मदक्ष---खरेंच महाराजांच्याविवाहसमयीं अशी वार्ता ऐकिली होती खरी.

धैर्यशील—(टाळी देऊन) तर मग माझा असा तर्क होतो कीं,

दिंडी.

निराशेनें क्रोधाग्नि पेट घेई ।।
भुपचित्तीं रणहेतु हाचि होई ।।

जसें जेथें होणार घडुनि जातें ॥
परी मूर्खांचें चित्त नावरे तें ! ॥ १ ॥

धर्मदक्ष—धैर्यशीला, तुमचा तर्क सयुक्तिक दिसतो; खरा, आणखी कोणी असेंहि ह्मणतात कीं, आमच्या महाराजांकडून कामपालाला करभार देणें राहिल्यामुळें त्यानें आपणावर स्वारी केली.

धैर्यशील—प्रधानजी, हा आपला कांहीं तरी बादरायण संबंध जुळविण्याचा प्रयत्न आहे. आणखी असें आहेः–

श्लोक.

मनस्येकं वचस्येकं कर्मण्येकं महात्मनाम् ॥
मनस्यन्यद्वचस्यन्यत्कर्मण्यन्यद्दुरात्मनाम् ! ॥ १ ॥

तेव्हां, त्याचा अंतःस्थ उद्देश काय होता, तें ठरविणें मोठें अवघड आहे. बरें पण, आतां पुढें काय करावयाचें ?

धर्मदक्ष—धैर्यशीला, असें पहा:–

पद. (चाल—वसंतीं बघुनि मेनकेला०)

जरी कां विपत्काल आला ॥ धैर्य धरोनी कार्य
साधणें योजुनि युक्तीला ॥ ध्रु० ॥
प्रयत्नें जिंकुनि शत्रूला ॥ प्रकट करावा प्रभाव वीरें
भूषण हें त्याला ! ॥ १ ॥
निराशा वेष्टुनि चित्ताला ॥ राहि जरी कां वैभव
कैसें लाभे शूराला ! ॥ २ ॥
अथवा स्तब्धचि जो बसला ॥ दुर्दैवाचे खेळ पाहतां
लांछन वीराला ! ॥ ३ ॥

धैर्यशील—प्रधानजी, आपलें भाषण सर्वस्वीं खरें आहे. आपणहि सांप्रतच्या विपत्तींतून मुक्त होण्याचा प्रयत्न करूं या; ह्मणजे मग,

पद. (चाल—अधम किति पालका)

ईश चिंता निवारील सारी ।। संकटीं शरण त्यां साह्यकारी ।। ध्रु० ।। न्यायपथ सोडुनी भ्रष्ट जे वागती ।। सज्जनां गांजिती घोरकर्मैं ।। आचराति नीतिला, तुडविती पदतलीं ।। भोगिती शासना घोर वैरी. ।। ईश० ।। १ ।।

धर्मदक्ष—धैर्यशीला, मला वाटतें आपण अशी युक्ति करावी, ह्मणजे आपला बेत साधेल. (कानांत सांगतो.)

धैर्यशील—(मान डोलवून) ठीक आहे. या प्रमाणेंच करावयाचें प्रधानजी चला तर मग आतां:—

साकी-

सफल करूं या हेतु आपुला सत्वरि बुद्धिबलानें ।।
दुष्टबुद्धि जे दुर्जन त्यांचा नाश घडे नियमानें ।।
ईशकृपा होवो ।। अवघें दैन्य लया जावो ! ।। १ ।।

(पडदा पडतो.)

चवथा अंक समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ—अशोकारण्य.

(मोहना पुरुषवेष धारण केलेली सचिंत अशी प्रवेश करिते.)

मोहना—(सुस्कारा टाकून) काय करावं? दैवगति विचित्र आहे! देवा, काय हा दारुण प्रसंग आमच्यावर आला? (सद्गदित होऊन) त्या दुष्ट कामकिंकरानें प्राणनाथाचे कसकसे हाल मांडले असतील! (स्फुंदते.) कैलासपते, शंकरा, आतां एवढी तरी कृपा कर कीं,

पद. (चाल–माझ्या मनिंचें हितगुज०)

जन्म जाहलें विफलचि माझें त्यागिन प्राणाला ॥
सुखी करावें कृपाकटाक्षें मत्प्रिय नाथाला ॥ ध्रु० ॥
हरहर! कैसा विपत्काल हा दारुण कीं आला ॥
परम संकटीं कोणि न त्राता भूवरती उरला ॥
दुःख न सोसे जीवहि विरहें व्याकुळ बहु झाला ॥
तव पदकमलीं शरण असें मी आश्रय दे
मजला! ॥ जन्म० ॥ १ ॥

अथवा, हे कैलासनायका, नानाप्रकारच्या दुःखांमध्येंच अंत व्हावयाचा अशी विधात्याची योजना असली, तर तुला तरी ह्या हतभागीची करुणा कशी येईल?

(दुःखाकुल होऊन)

पद. (चाल–जाईं परतोनी बाळा०)

सौख्य नसे कांहीं ॥ जगुनी ॥ दैवहीन मी वांचुनि

कैसें ॥ मम जन्माचें सार्थक होई ॥ ध्रु० ॥
प्रिय पति चरणीं प्राण वाहिले ॥ दुर्दैवें ते
अंतरले ॥ ठेवुनि आतां प्राण जगीं हे ॥ फलहि
नसे उरलें ॥ आजवरी मज आशा होती ॥ परि
सारी ती व्यर्थचि जाई ॥ सौख्य० ॥

(फिरतां फिरतां एक सुंदर सरोवर दृष्टीस पडतें.)

—(सरोवराजवळ जाऊन) अहाहा! किती तरी रमणीय सरोवर हें;

पद. (चाल—अष्टमूर्ति परमेश०) धुमाळी

क्रीडास्थानचि वनदेवीचें दृष्टिस कीं पडलें ॥ स्वर्ण-
दिजळ भूवरि अथवा हें वाटे अवतरलें ! ॥ ध्रु० ॥
विमल हृदय हें साधुजनांचें किंवा संचरलें ॥ भांडारचि
हें कर्पूराचें भासतसे पहिलें ॥ निर्मल कीर्तीमंदिर कीं
हें प्रकट असे झालें ॥ चंद्राचें जणुं तेजचि येथें
एकवटे सगळें ! ॥ क्रीडा० ॥ १ ॥

(उल्हासानें) हे जलदेवते, कृपा करून ह्या दीन अभागीला आपल्या चरणांचा निरंतर आश्रय दे, म्हणजे मी सर्वथैव दुःखमुक्त होईन!

(सरोवरामध्यें उडी टाकण्यास प्रवृत्त होते, इतक्यांत शूरसेन प्रगट होतो.)

शूरसेन—(हात वर करून) हां हां,

पद.(चाल—वाटे सर्वथा मुक्त झालों०)

वीरा घोर हें कर्म करिशी ॥ ध्रु० ॥ साहसें कां

वृथा प्राण तूं त्यागिशी ।। शोभते नच तुला गर्ह्य
कृति ही अशी ।। लोकनिंदेसि कां पात्र
होशी ! ।। वीरा० ।। १ ।।

(हे वीर पुरुषा, थांब थांब, असा अविचारानें प्राणत्याग करूं नको.)

मोहना—(चपापून आपल्याशीं) अरे, हा कोण येथें एकाएकीं प्रगट झाला?

शूरसेन—हे वीरपुरुषा, ह्या सरोवरामध्यें प्राणत्याग करण्याचें कारण काय ?

मोहना—(अधोवदन करून) मी आपली सर्व हकीकत सांगतें, परंतुः—(ओशाळते.)

शूरसेन—(विस्मित होऊन आपल्याशीं) ' सांगतें ' असें ह्मटलें, यावरून हें काय गौडबंगाल आहे (उघड) वीरपुरुषा मनांत कोणत्याहि प्रकारचा संकोच न धरितां निःशंकपणें सर्व वर्तमान निवेदन कर.

मोहना—(पुरुषवेष काढून ठेवून व सद्गदित होऊन) क्षत्रियकुलभूषणा, प्रारब्धाच्या अनिवार प्रसंगामुळ मला असं वेषांतर करावं लागलं आणखी या घोर अरण्यांतून (गहिंवरते.)

शूरसेन—(आपल्याशीं) माझी शंका खरी झाली तर! (उघड) साध्वि, दुःखाकुल होऊं नको. तुझी हकीकत मला कळूं दे.

मोहना—(गहिंवरून) महाभागा, माझी कर्मकथा सांगून काय उपयोग? तुला विनाकारण दुःख मात्र होईल.

शूरसेन—(आपल्याशीं) या वेळीं ज्यास्त विचारणें

ठीक नव्हे. (समोर पाहून) साध्वि, तो पहा तेथें एक आश्रम दिसत आहे.

मोहना—महाभागा, हा आश्रम दृष्टीस पडल्यामुळें मला पुन्हा सुखाचे दिवस येतील अशी आशा वाटूं लागली आहे. चलावें तर मग तिकडेच.

(शूरसेन व मोहना कांहीं चालून गेल्यावर आश्रमांत ज्ञानेंद्रस्वामी समाधिस्थ दृष्टीस पडतात).

शूरसेन—अहाहा ! काय दिव्य तेज हें!

मोहना—खरंच, मुद्रा तरी किती शांत व सौम्य दिसत आहे. स्वामी महाराजांच्या दर्शनानें कृतार्थ झालें.

(ज्ञानेंद्रस्वामी समाधि विसर्जन करितात.)

ज्ञानेंद्रस्वामी—(आशीर्वादात्मक नारायण ! नारायण असें ह्मणून) वत्से, बैस. वीरपुरुषा बसावें (मोहनेला उद्देशून) ह्या निबिड घोर अरण्यांत तूं एकटी कोठून कशी प्राप्त झालीस ?

मोहना—(विनयानें) स्वामीमहाराजांना योगसामर्थ्यानें सर्व विदितच आहे; तथापि, आज्ञेला अनसरून सांगतें

पद. (चाल—चंद्रकांत राजाची कन्या.)

वीरकांत भुपाची दुहिता प्रिय मी पतिराया ॥
नांव मोहना हें अंगदेश पति-चंद्रसेन—जाया ॥
॥ ध्रु० ॥ कामपाल नृप दुष्ट—बुद्धि तो कपटें पति-
राया ॥ अवचित करुनी बद्धहि नेई निजनगरा
वाया ॥ छळी बहु मला नरपशु अपुलें नांवचि
बुडवाया ॥ संधि साधुनी युक्तिबलानें प्राणां
राखाया ॥ गुप्तपणें वेषांतर करुनी फिरलें विपिनीं
या ॥ नानाविध मी क्लेश भोगिले प्राणहि हे

उत्सुक होतें; परि सुकृतानें आलें या ठायां ।।
कृपाप्रसादें दीन मम दशा न्यावी ही विलया! ।। वरि०।३।।

ज्ञानेंद्रस्वामी—वत्से, तूं कांहीं चिंता करूं नको. तुझे भावी मनोरथ पूर्ण होण्याचें स्थान हेंच आहे. (शूरसेनास) वीर पुरुषा तुझी वासभूमि कोणती तें सांग पाहूं.

शूरसेन—(हात जोडून) महाराज,

पद. (चाल—सांगतों तुम्हां वृत्तांत.)

त्या महामत्सरी कामपाल नृपाला।। प्रियमित्र ह्मणुनि मी बोध बहु परि केला ।।ध्रु०।। असह्य माझा तिरस्कार ही झाला ।। मज आश्रय तैसा क्षणभर नच तो रुचला ।। देश त्यागुनि आलों वनवासाला ।।सुदैव योगें आश्रम मज हा दिसला! ।। त्या० ।।

मोहन—(विनयातें) आणखी महाराज, या अरण्यांत दुःखानें व्याकुळ होऊन सरोवरामध्यें प्राणत्याग करण्यास मी प्रवृत्त झालें असतां या महाभागाच्या अकस्मात् आगमनामुळेंच तो प्रसंग टळला.

ज्ञानेंद्रस्वामी—असो; सर्व वृत्तांत माझ्या ध्यानीं आला. आतां हे वीरपुरुषा, ही रुद्राक्षांची माळ घेऊन तूं परत कामपाल राजाच्या राज्यांत गुप्तपणें जा. नगराबाहेर देवीच्या देवालयामध्यें तुला एक साधु पुरुष भेटेल, त्याला तूं सहाय कर, ह्मणजे तुला पुढें उत्तम स्थिति प्राप्त होईल. (माळ काढून देतो.)

शूरसेन—(वंदन करून व माळ घेऊन) स्वामी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास हा दास तत्परच आहे. (जातो.)

ज्ञानेंद्रस्वामी—वत्से, या आश्रमामध्यें सुखानें रहा बरें. फार काय सांगूं ?

साकी-

शकुंतलेला कण्वमुनींनीं कन्येसम वागविलें ॥
तैसें तव हें अखंड भाग्यस्थलचि असे ठरलेलें ॥
नकळे कोणाला ॥ अभ्दुत जगदीश्वरलीला! ॥ १ ॥

(जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—अरण्यांतील रस्ता.

शूरसेन—(आपल्याशीं) काय चमत्कार आहे ! शेवटीं त्या नीचवृत्ति कामपाल राजानें चंद्रसेनावर अविचारानें स्वारी करून त्याचा भयंकर छळ मांडिला ना ! मी त्याच वेळीं तीर्थप्रयाणाचे निमित्तानें देशत्याग केला, हें उत्तमच झालें. कारण,

पद. (चाल—मम लालस कर्णी मांड—दादरा.)

खलसंगति नाशा कारण होई बोलहाखरा ॥ मायिक त्यांचा लोभहि सारा ॥ ध्रु० ॥ चंचल वृत्ती क्षणिकचि प्रीति स्थिर नसे जरा ॥ मानस त्यांचें पळहि न तसा संग तो बरा ॥ बुध जाणति ऐसा मोहपसारा ॥ खल० ॥ १ ॥

बरें, पण मी या अशोकारण्यांतून प्रवास करित असतां ती साध्वी मोहना राणी प्राणत्याग करण्यास उद्युक्त झालेली

दृष्टीस पडली, व इतक्यांतच एक आश्रमहि दृष्टीस पडला हा काय चमत्कार आहे ! मला तर असा भास होतो:—

पद. (चाल-सफल जन्म जाहला.)

स्पप्न काय देखिलें ।। महत्पदासि पाहिलें ।। भाग्य
हें भलें ।। ध्रु० ।। योगिराज वंदनें ।। पतिव्रता
सुदर्शनें ।। धन्य जन्म जाहलें ।। स्वप्न काय० ।। १ ।।

बरें, आतां आपण स्वामी महाराजांच्या आज्ञेप्रमाणें पुन्हाः कामपालाच्या राज्यांत प्रवेश केलाच पाहिजे. कसाहि प्रसंग आला तरी भक्तकाजकल्पद्रुम दयाघन परमेश्वर सर्व संकटांचें निरसन करण्यांस समर्थ आहे ! (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—कारागृह.

(पडदा उघडतांच चंद्रसेन सचिंत शोक करित बसला आहे, देवडीवर शिपाई आहे, असें दृष्टीस पडतें.)

चंद्रसेन—(आपल्याशीं) हरहर ! दुर्दैवाची गति मोठी विलक्षण आहे ! दुर्दैवा, तुला माझा उत्कर्ष सहन झाला नाहींना ? अरे,

पद. (चाल—अरिनें काय दशा केली.)

अजुनी अंत किती बघशी ।। माझा दैवारे ।।
।। ध्रु० ।। मजला प्राणसखी विण खास ।। वाटे
जग हें सकल उदास ।। गेला वैभवरवि अस्तास ।।
अहा ! मत्प्राण हळहळती ।। अजुनी० ।। १ ।।

छे: पण, असें निराश होऊन काय उपयोग? या प्रसंगांतून धैर्यानें पार पडलें पाहिजेः—

पद. (चाल -सरर.)

मत्सरी शत्रु कपटी थोर ॥ आचरि कर्मे किति हीं घोर ॥ पापी खल तो वधितों चोर ॥ काळ समोर जरि आला! ॥ अर्जुनी० ॥ १ ॥

(पुनः खिन्न होऊन) पण हें घडणार कसें ? या बंदिवासांतून सुटण्याला मार्ग कोठें आहे ? (दुःखाकुल होऊन) कैलास पते, शंकरा,

पद—चाल—छळिशी किति मजला.

शरण कुणा जाऊं ॥ आतां शरण० ॥ श्रीगिरिजेशा तुजविण कोणा परम संकटीं ध्याऊं ॥ ध्रु० ॥ मजला त्राता क्लेशांतुनि या विश्वपते नाहीं ॥ यास्तव कीं हे प्राण तुला मी सर्वथैव वाहूं! ॥ १ ॥

(शोकग्रस्त होतो.)

(इतक्यांत एक साधु देवडीवर येतो.)

साधु—

पद (चाल—निजरूपी जगदाकृति)

योगीहृदयानंद विलासा ॥ मुनिजन मानस परम निवासा ॥ ध्रु० ॥ जग हें मायामोहें भुललें क्षणिक सुखाचा धरी भरंवसा ॥ योगी० ॥ विन्मुख होउनि तव भक्तीला ॥ अनुदिनिं वाढे बहुतचि आशा ॥ योगी० ॥ भाव निरंतर दृढ तर राहो ॥ व्हावें तनुचें सार्थक ऐसा ॥ योगी० ॥

पद. (चाल—झडकरि निजरूप)

शिवशंकर तव पद पाहूं दे ।। शिव० ।। अखिल सुखांचें पूर्णनिधानाचि चरण कमल तव पाहूं दे ।। शिव० ।। १ ।। दृढ भक्तीनें बद्ध होउनी ।। पदकमलीं मन राहूं दे ।। शिव० ।। २ ।।

पद. (चाल—अलखजटा मुगुट०

जय जयश्री विश्वपते नमन तूजला ।। जनन मरण—दुःखांतुनि मुक्त करिं मला ।। ध्रु० ।। संसारीं ताप बहू देह शिणला ।। नानाविध विषयसंग तुच्छ वाटला ।। षड्रिपुसंग्राम करुनि जीव भागला ।। आश्रय दे चरणीं दास लीन जाहला! ।। जय० ।। १ ।।

पद.(चाल— राम स्मरावा राम०)

जग हें नश्वर जाण ।। खरोखर जग हें ० ।। ।। ध्रु० ।। इह संसारीं दुःख किती हो, व्याकुल होती प्राण ।। खरोखर० ।। १ ।। मायामय हें विश्व चराचर, निर्मियलें कुणि जाण ।। खरोखर० ।। २ ।। उत्पत्ति—स्थिति-लय कर्ता जो, त्याचें करिं तूं ध्यान ।। खरोखर ० ।। ३ ।।

(इकडे तिकडे फिरत फिरत पुढें जाऊं लागतो.)

शिपाई—(त्यास दरडावून) अरे ए गोसावड्या, पुढें कुठे चाललास ? चल येथून मागें हो.

साधु—(लीनतेनें) अरे, मी एक निरिच्छ प्राणी आहे, मला कां उगाच दटावतोस ?

शिपाई—असल्या आपमतलबी ढोंगी साधूचें तर बुवा अलीकडे पेंवच फुटलें आहे.

साधु—(जरा पुढें होऊन) अरे, मी तशांतला नव्हे, समजलास.

शिपाई—(डोळे वटारून) हं, पुढें जाण्याची मनाई आहे.

साधु—(अंगठी दाखवून) हें पहा, माझी थोडकीशी कामगिरी करशील तरः—

शिपाई—(हळूच) काय ह्मणणें आहे ?

साधु—या कारागृहांतल्या बंदिवानाला क्षणभर भेटूं दे. घे तुला बक्षीस. (अंगठी पुढें करितो.)

शिपाई—(अंगठी घेऊन) पण माझ्या गरिबाच्या पदरीं कांहीं लबाडी येणार नाहीं असें करा, ह्मणजे झालें.

साधु—(जातां जातां) त्याची नको काळजी तुला —(त्वरेनें चंद्रसेनाजवळ जाऊन) हं महाराज उठा उठा.

चंद्रसेन—(निरखून) कोण धैर्यशील ? मित्रा, भेट ये पाहूं. (दोघे भेटतात.)

धैर्यशील—(कफनी वगैरे काढून) महाराज, हा माझा वेष धारण करून येथून त्वरित निघून जावें. आपण दोघे वयानें व रूपानें एक सारखेच असल्यामुळें आणि ही वेळ संध्याकाळची असल्यामुळें कोणी ओळखणार नाहीं. विलंब मात्र लावुं नका.

चंद्रसेन—(आपला पोषाख धैर्यशीलास देऊन व कफनी वगैरे घालून) बरें पण मित्रा धैर्यशीला, तुझी वाट काय ?

धैर्यशील—(कानांत सांगतो) असें केलें ह्मणजे झालें. ईश्वर आपला पाठि राखा समर्थ आहे.

चंद्रसेन—खरेंच, धैर्यशीला, आज मजवर तुझे हे केवढे उपकार झाले ह्मणून सांगूं ?

पद. (चाल—अरे मुवे छोड०]

खरा मला मित्र तूंचि साह्यकारि संकटीं ॥ थोर
मी ऋणी तुझा ॥ प्रेम मूर्ति मित्र तूं ॥ प्राण करीं
घेउनियां येशि येथ शेवटीं ॥ खरा० ॥ १ ॥
राजनिष्ठ एक तूंचि ॥ असति धैर्यशाली ॥
शत्रुबला सहज हरूं प्राप्त होय सद्गती ॥
॥ खरा० ॥ २ ॥

धैर्यशील—(विनयानें) महाराज, यांत काय विशेष आहे ?

दिंडी.

राजनिष्ठा हा धर्म कीं प्रजेचा ॥ उभय पक्षीं
कल्याण कारि साचा ॥ जरी भूप सदा वागवी
प्रजेला ॥ पुत्रसम तरि मग काय उणें त्याला ॥ १ ॥

चंद्रसेन—धैर्यशीला, तुझें भाषण अगदीं खरें आहे.

धैर्यशील—(इकडे तिकडे पाहून) महाराज, बराच अवधि झाला; आतां येथून गुप्तपणें एकदां सुटून जावें तें चांगलें.

चंद्रसेन—हा पहा चाललोंच “ शुभस्य शीघ्रं ” परमे-

श्वर सत्य पक्षाचा अभिमानी आहे. (त्वरेनें देवडीवरून निघून जातो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

स्थळ—विश्रांतिस्थान.

(कामपाल राजा सचिंत प्रवेश करितो.)

कामपाल—(आपल्याशीं) काय करावें. कांहीं सुचत नाहीं. त्या चारुगात्रीला पाहिली काय, मला एकाएकीं मूर्च्छा आली काय, आणखी अकस्मात् ती राजवाड्यांतून नाहींशी झाली काय, मला हें सगळें स्वप्ना सारखें वाटतें. (मोह उत्पन्न होऊन) प्राणसखे मोहने, तुझ्यावांचून हे माझे पंचप्राण कसे व्याकुळ होऊन गेले आहेत खरोखर,

पद. (चाल—नको विवाहचि हा०)

नसे जगीं अणु सौख्य मला।।जग हें सारें उदास
भासे ।। मान नको सन्मानहि सुटला ।। ध्रु० ।।
सुंदरी लाभे मज कैशी ।। मन्मन हें रमणी विरहें ।।
दुःखा न सहे ।। धीरहि तुरला ।। नसे० ।। १ ।।

—(भ्रमानें) प्रिये मनमोहने, नाहीं का तुला माझी करुणा येत? हा पहा मी तुला शरण आलों आहें. नको माझी उपेक्षा करूं. मोहने, प्रिये मोहने; (भ्रमिष्ट होतो.)

(इतक्यांत प्रबुद्धि प्रधान प्रवेश करितो त्यास) कोण मोहने, ये ये. हा मी तुझा दास सेवेला तत्पर आहे.

प्रबुद्धि—(आपल्याशीं एकीकडे) अरे, हें काय? मी हें स्वप्न तर पाहत नाहींना? छे, खचित नव्हे. महाराजांची वृत्ति अशी भ्रमिष्ट कां बरें झालेली दिसते ?

कामपाल—(पुनः भ्रम पावून) प्रिये, माझे मनोरथ पूर्णकर ये.

प्रबुद्धि—(आपल्याशीं) आपला डाव साधण्यास ही वेळ चांगली आहे.

कामपाल—मोहनेच्या शोधाकरितां पाठविलेले दूत अजून कां बरें परत येत नाहींत ? (भ्रमानें) मोहने प्रिये मोहने.

प्रबुद्धि—(आपल्याशीं) महाराजांना हा विलक्षण भ्रम कां उत्पन्न होत आहे, याचें कारण तर स्पष्टच कळलें. या भ्रमिष्ट स्थितीचा चांगलाच उपयोग करून घेतला पाहिजे. (पुढें होऊन वंदन करितो.)

कामपाल—(उत्सुकतेनें) कोण दूता, मोहनेचा शोध लागला का ?

प्रबुद्धि—(लीनतेनें) महाराज, मी आपला सेवक प्रबुद्धि आहें.

कामपाल—(ओशाळून) कोण प्रधानजी, यावेळीं काय विशेष वर्तमान आहे?

पद. (चाल—जरूर स्वर्गभूवरी.)

दैवहीन ह्मणुनि अह्मी यत्न खुंटला ॥ शत्रूनें
कपट करुनि डाव साधिला ॥ ध्रु० ॥ धनलोभी
धनदासे साह्य होउनी ॥ राजभक्ति दूषविली लाच
खाउनी ॥ चंद्रसेन बंधमुक्त करुनियां दिला ॥
आश्रम तन्मित्रातें घात जाहला ! ॥ दैवहीन० ॥ १ ॥

कामपाल—(क्रोधानें) हा दुष्टा धनलंपटा, केवढें नीच कर्म केलेंस हें? प्रधानजी, जा त्या राज्यघातक्याला कैद करून ठेवा.

प्रबुद्धि—महाराज, मला ही बातमी कळतांच त्याला कैद करून त्याचें सर्व द्रव्य जप्त केलें आहे. महाराजांनीं ही अंगठी ठेवून घ्यावी.

कामपाल—(अंगठी घेऊन) शाबास प्रधानजी, तुह्मीं योग्य व्यवस्था केलीत. आतां सैन्यासह सत्वर जाऊन शत्रूचा पाठलाग करून धरून आणा.

प्रबुद्धि—आज्ञा महाराज. (निघून जातो.)

कामपाल—(अंगठीकडे पाहून) हे मुद्रिके, माझ्या सारखी तूं सुद्धां दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलीसना? कारण असें पहाः—

पद. (चाल-नंदनंनन देवीनें माझा०)

कोमल रमणी हस्ता त्यजुनी दुःख तुवा वरिलें ॥
गडे मुद्रिके अवचित कैसें दैव तुझें फिरलें ॥ ध्रु०॥
करकमलाच्या सहवासानें सफल तुझें झालें ॥
सौंदर्य खरें परि दुर्दैवें तेंही अंतरलें ॥ १ ॥
काय तुझा अपराधाचि घडला ह्मणुनी त्यागियलें ॥

सुंदरिनें तुज निष्ठूरतेनें होंहि मला नकळें ॥
कोमल० ॥ २ ॥

—(निरखून) ह्या अंगठीवर ' मोहना ' असें नांव कोरलेलें आहे, यावरून निःसंशय ही त्या प्राणवल्लभेचीच असली पाहिजे. (चुंबन घेतो.)

(इतक्यांत भामिनी प्रवेश करिते, व कामपालास आलिंगन देऊन बाजूस बसते.)

कामपाल—प्रिये, आज अशी खिन्न कां दिसतेस?

भामिनी—प्राणनाथ, खरंच सांगूं का? आपल्या मनाची स्थिति अलीकडे व्यग्र झालेली पाहून:—

पद. (चाल—उद्यां यच जातें.)

कळेना कांहीं ॥ मम मति ही कुंठित होई ॥
॥ ध्रु० ॥ सान्निध सुखवस्तु बहु असती ॥ यांतुनि
न रुचे एकहि संप्रति ॥ भासे अवघी शून्यचि
जगती ॥ निरंतर देई ॥ कोण हा ताप; सुख
नाहीं ॥ कळे० ॥

कामपाल—(दचकून आपल्याशीं) अरे, माझीं कृष्णकारस्थानें इतक्यांतच उघडकीस आलीं कीं काय? बरें, हिला कशीं समजलीं? (उघड) प्रिये, ही कसली विनाकारण भलतीच शंका आली तुला?

भामिनी—असं नव्हे प्राणनाथ, पण आणखी,

पद. (बंजाराच्या चालीवर.)

ऐकुनी विविधजनवार्ता ॥ वाटतो खेद मम चित्ता॥
॥ ध्रु० ॥ बहु हानी कीर्तिवित्ता ॥ डळमळीत
झाली सत्ता ॥

कामपाल—(मध्येंच आपल्याशीं) अरे, हें तर उघड मला उद्देशून आहे.

भामिनी—

(वरील पदाची चाल.)

जिंकिले अमित भूपती ।। अशि नसे एकही रिती।।
गांजुनी तापही अती ।। बहु काल तयांला देऊन।।
लवहि अवगुण ।। नसे तरि कांता ।। व्यर्थ कां
छळितसां आतां ! ।। एकुनी० ।। १ ।।

कामपाल—(एकदम क्रोधानें भामिनीला लोटून देऊन) हां दुष्टे, जीभ आटप. धिःकार असो तुला. भोग आपल्या अविचाराचीं फळें. (संतापानें पाय आपटींत निघून जातो.

भामिनी—(दुःखाकुल होऊन) अरेरे, केवढा अविचार माझ्या हातून झाला हा? परमश्वरा, माझें रक्षणकर्ता एक तूंच आहेस.

अंजनीगीत.

निरपराधि मी पति कोपाला ।। पात्र जाहलें भो जगपाला ।।
संकटकाळीं या अबलेला ।। तुजीवण नच त्राता ।। १ ।।

(पडदा पडतो.)

प्रवेश ५ वा.

(स्थळ—अरण्य, देवीचें देऊळ.)

(पडदा उघडतांच साधुवेष धारण केलेला चंद्रसेन देविसन्निध हात जोडून स्तुति करीत आहे, असें दृष्टीस पडतें.

चंद्रसेन—

पद—(राग मालकंस, दीपचंदी) चाल—तुझी अन्यथा तो०

महाकालिके दैत्य विध्वंसिनि ।। निशुंभशुंभंतके हैम-
गिरिनंदिनि ।। ध्रु०।। सदा विश्व हें निर्मुनी रक्षिसि
अहंकारमत्तां खलां मर्दुनी ।। महा० ।। सुरासुर

तुझ्या पदा वंदुनी ॥ प्रसादेंचि होती यशस्वी जनीं ॥प्र०

पद. (राग–परज; ताल–त्रिताल.
चाल–जयश्री भगवति अवि.)

जयश्री हिमनग प्रियतनये ॥ धृ० ॥ तव पद रत
जे भक्तशिरोमणि दैन्य तयांस न ये ॥ जयश्री० ॥ १ ॥
खलरिपुमद संहरण कराया सहाय हो सदये ॥
जयश्री० ॥ २ ॥

—(लीन होऊन) आई जगदंबे, या अशा निर्जन अरण्यामध्यें मला तुझ्या पायांवांचून कोणाचा आधार आहे? भगवति, तुझ्या कृपेनें या नानाविध क्लेशप्रपंचांतून उद्धार व्हावा, हेच चरणापाशीं वारंवार प्रार्थना आहे. (ध्यानस्थ होतो.)

(शूरसेन प्रवेश करितो.)

शूरसेन—(एकीकडे आपल्याशीं) स्वामी महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें हेंच तें देवीचें देऊळ, आणखी हेच ते साधुपुरुष. असो; (निरखून) हे तर ध्यानस्थ आहेत, तेव्हां एकदम पुढें जाणें प्रशस्त नव्हे.

चंद्रसेन—(डोळे उघडून) आई विश्वजननी, या दासावर कृपादृष्टि होऊं दे.

शूरसेन—(पुढें जाऊन देवीस व साधूस वंदन करितो)

चंद्रसेन—(शूरसेनास उद्देशून) क्षत्रियकुलावंतसा, तूं कोण आहेस?

शूरसेन—(हात जोडून) महाराज,

पद–(चाल–उद्धवा शांतवन कर०)

मी कामाल भूपाचा ॥ प्रियमित्रचि होतों साचा ॥
॥ ध्रु० ॥ परि योग्य बोध करितांना ॥ अपमानि-
यलें धिःकारीं ॥ मग फिरतां देशोदेशीं ॥ “ सुख
दुःखमयचि संसारी ” ॥ दृढ भाव साध्वि एक

धरी ॥ देण्यास प्राण कासारीं ॥ चाल ॥ असतां उत्सुक; मी सहसा ॥ येतां मृत्यु टळेल तैसा ॥ मग आश्रम पुण्यस्थलसा ॥ चाल ॥ दिसला निधि परमसुखाचा ॥ मी कामपाल ० ॥ १ ॥

चंद्रसेन—तो आश्रय येथून कोठेंसा आहे?

शूरसेन—(विनयानें) महाराज,

साकी.

महातपस्वी मुनी राहती अशोकवनिके माजी ॥
योगबलानें सर्व जाणती ऐशी मति हो माझी ॥
दिव्य किती मूर्ति ॥ बघतां हर्ष होय चित्तीं ॥ १ ॥

चंद्रसेन—अशा महात्म्यांचा अनुग्रह होण्यास पदरीं मोठाच पुण्यसंग्रह असला पाहिजे.

शूरसेन—(अक्षमाला पुढें करून) त्या आश्रमांत राहणाऱ्या मुनीवर्यांनीं आपणास ही अक्षमाला प्रसाद ह्मणून दिली आहे.

चंद्रसेन—(अक्षमाला घेऊन) हा मोठाच अनुग्रह झाला. (निरखून आपल्याशीं) ही अक्षमाला मी पूर्वी केव्हां तरी पाहिलेली आहे. छे, संशयच नको. (नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागतात.)

शूरसेन—(आपल्याशीं) महाराजांच्या वृत्तींत एकाएकीं फरक कां बरं पडला?

चंद्रसेन—(गहिंवरून) ही अक्षमाला देतांना मुनिवर्य काय ह्मणाले?

शूरसेन—महाराज, त्या अरण्यामध्यें नानाप्रकारच्या दुःखांमुळें निराश होऊन प्राणत्याग करूं पाहणाऱ्या त्या साध्वीचें सर्व वर्तमान ऐकून घेतल्यावर, ते मुनिराज तिला ह्मणाले कीं:—

पद. (चाल—दिसलि पुनरपि०)

सकल मनोरथ पुर्निस्थळ हें आनंदानें वस येथें ।।
ईशकृपेनें शीघ्रीच अवघें दैन्यहि जाइल
विलयातें ! ध्रु० ।। १ ।।

चंद्रसेन—(मध्येंच उत्सुकतेनें) अशा त्या पुण्यशील साध्वीचें नाम श्रवण करण्याविषयीं कोणाला जिज्ञासा होणार नाहीं?

शूरसेन—(आशय ओळखून.)

पद. (चाल-सदर)

नांव ' मोहना ' असे तियेचें सत्वशील ती पतिव्रता

चंद्रसेन—(चपापून आपल्याशीं) ती माझीच प्राणसखी नसेलना? नामसादृश्यावरून तर शंका येते!

शूरसेन—

अंगदेश पति चंद्रसेन जो नृपती त्याची ती कांता ! ॥

चंद्रसेन—(दु:खाकुल होऊन आपल्याशीं अरेरे, माझ्या प्राणसखीची काय ही कष्टमय अवस्था. (धरणीवर अंगटाकितो)

शूरसेन—(घाबरून) अरे हें काय ! (वारा घालूं लागतो.) (इतक्यांत शिपायाच्या वेषानें धैर्यशील प्रवेश करितो.)

धैर्यशील—(आवेशानें) हं हं खबरदार या साधु महाराजां च्या प्राणास कांहीं अपकार होईल तर!

शूरसेन—(लीनतेनें) माझ्याविषयीं विपरीत ग्रह करूं नका. मी आपलाच हितचिंतक आहे. (चंद्रसेनास सावध करितो.)

चंद्रसेन —(गहिंवरून) मित्रा धैर्यशीला, भेट ये पाहूं.

धैर्यशील—(भेटून) महाराज, आपली वृत्ति आज खिन्न कां दिसते?

शूरसेन— धैर्यशीला, महाराजांच्या औदासिन्याचें कारण मी आहें.

धैर्यशील—तें कसें तें कृपा करून सविस्तर सांगा.

शूरसेन—मी पूर्वी कामपालाचा मित्र होतों. माझें नांव शूरसेन चंद्रसेनराजावर स्वारी करण्याविषयीं मी प्रतिकूल मत दिल्यामुळें कामपालानें माझा धिःकार केला. यासाठीं मी देशत्याग करून अरण्यांतून फिरत असतां एका दुःखाकुल साध्वीला आत्महत्त्येच्या पापापासून मुक्त केली. त्या साध्वीचें नांव मोहना ती राजा चंद्रसेनाची भार्या त्याच अरण्यांतील एका आश्रमांत राहाणाऱ्या मुनिवर्यांनीं ही अक्षमाला मजजवळ देऊन महाराजांस (चंद्रसेनास उद्देशून) देऊन सहाय करण्यास सांगितलें. असा वृत्तांत सांगत असतां महाराजास एकाएकीं मूर्च्छना आली.?

धैर्यशील—(उल्हासानें) शूरसेन, सर्व वृत्तांत माझ्या ध्यानीं आला. यापुढें आतां आपण परस्पर मित्र झालों. (चंद्रसेनास उद्देशून) हेच आमचे चंद्रसेन महाराज, आणि ती साध्वी राजपत्नी होय?

शूरसेन—(आश्चर्यभरित होऊन) ईश्वरी संकेत विचित्र आहे. असो? आतां आपण परस्पर मित्र झालों (धैर्यशीलास भेटतो.)

धैर्यशील— महाराज, आतां आपली दैन्यावस्था संपत आलीच.

चंद्रसेन—(गाईंवरून)

पद. (चाल–मी कुमार तीहि०)

ही अपार संसृतियात्रा करितांना दुखें भारी ॥

मानवां सर्वदा होती; सुख थोडें या संसारीं ॥
बहु कृपा हरीची असतां तीं लोपति विघ्नें सारीं ॥
॥ चाल ॥ हा मित्रवर्ग साह्याला ॥ मग भीति
नच आह्मांला ॥ भुजबल तें दावूं सकलां ॥ श्री
हरि मग आह्मां तारी ॥ उत्साह मनीं जो धरिला;
तो देइ महा लाभाला. ॥ ही० ॥ १ ॥

धैर्यशील--महाराज, चला आतां कांहीं वेळ विश्रांति घेऊन पुढील विचार ठरवूं. (सर्व जातात.)

प्रवेश ६ वा.

स्थळ--अशोक अरण्य

(कामपाल व सारथी असे रथासह दोघे प्रवेश करितात.)

कामपाल--सारथे, इथेंच रथ उभा कर, कारण या अरण्यातील तरुवर अतिशय ऊंच व घन दाट असल्यामुळें आपणास रथासह पुढें जाण्यास मार्ग नाहीं पहा-

साकी.

लता तरुतें प्रेमानें जणूं आलिंगन कीं देती ॥
मृग पक्षांचे समूह येथें स्वेच्छेनें फिरताती ॥
रम्य किती तरि ही ॥ शोभा बहु सौख्या देई ! ॥ १ ॥

सारथी--महाराज तो पहा एक मृग आश्रमा कडे शीघ्रगतीनें पळत चालला आहे.

कामपाल--(विस्मयानें) सारथे या घोर अरण्यांत कोणाचा हा आश्रमअसावाबरें आपण बोलत बोलत आश्रमाच्या जवळ आलों आहों

पद. (अंकित बद्धांबुजा ची राशी) ही चाल.

आश्रम किती तरी हा देई ॥ सुख मनोवृत्तिता
पाहिं ॥ध्रु०॥ हरिण बालकें क्रीडा करिती हर्षेचि
बघूनि होई॥ आश्रम० ॥ १ ॥ सुगंधि तरुवर कुसुम
भरानें खेद लयाला जाई ॥ आश्रम० ॥ २ ॥
पर्णलतांनीं जरि बांधियला सुंदर शोभा दायि ॥
आश्रम० ॥ ३ ॥

सारथे, याच ठिकाणीं उभा रहा तूं मी आश्रमवासी मुनिचें दर्शन घेऊन येतों. (पुढें जाऊन आपल्याशी,) या अश्रमांत मुनि नसुन एक स्त्रीमात्र आहे "ही कोण असावी बरें"(निरखुन पाहून) अरे ही तर माझी प्रिय मोहना! (आनंदित होऊन मोहनेस) प्रिये, मोहने, (तिला धरावयास जातो)

पद (चाल—मन मजला वाहिलें.)

मम मनहें मोहिलें ॥ सखे त्वां ॥ ध्रु० ॥ तव
लावण्या लुब्ध होउनि ॥ बघ वन हें सेविलें ॥
सुंदरी ० ॥ १ ॥ सकल ननोरथ पुरवीं माझे ॥
दैन्य तुझें संपेल ॥ पहागे ॥ मम० ॥ १ ॥

मोहना—(भयाभितहोऊन)"अगबाई" हा मेला कामपाल आणि या ठिकाणीं कसा आलाहा. (रागानें) दुष्टा,कामकिंकरा, जा काळें तोंड करून, येथून चालता हो कसा.

कामपाल—प्रिये, हे पहा मी तुझे पाय धरितों (पायधरावयास जातो) पण—

पद. (चाल—कर टाकें सखेगे०)

नच कोप धरींगे तूं स्वमनीं॥तुज विण मज कुणि॥
प्रिय न सकल जनीं ॥ भोगुनि अनुदिनिं ॥

वैभवसुख आणिं ॥ हो श्रेष्ठ तूंचि प्रिय राणी ॥
घे हा पाणी ॥ नच० ॥ १ ॥ (पुढें जाऊं लागतो)

मोहना—अरे देवा, यामेल्या दुष्टापासून आतां माझें रक्षण कोण करील. स्वामि महाराज गंगेवर स्नानास गेले आहेत. त्यानांही येण्यास बराच वेळ लागेल. (कामपालास विनयानें)

पद. चाल—तूं टाक चिरुनि ही मान०)

हा छंद बरा नच जाण ॥ मनीं हें आण ॥ बहु
घात जाहले कुमति मुळें या नाहिं तुला तें
भान ॥ ध्रु० ॥ तो सुरेंद्र भोगी शाप ॥ सुर,
मुनिस हा अनुताप ॥ दशमुखेंहि केलें पाप ॥
तो सबल विननष्टचि होइ, कसें रे नाहीं, तुला तें
ज्ञान ॥ हा छंद ०॥ १ ॥ क्षयरोग जडे चंद्रास ॥
त्या सुयोधनाचा नाश ॥ सुख नव्हे विषचि हें
खास ॥ हें स्पष्ट असोनी किमर्थ पापी वृत्ति तुझी
अज्ञान! ॥ हा छंद० ॥ २ ॥

कामपाल—(कामातुर होऊन) सुंदरी पुरे तुझा आतां हा बोध तुला अजुन माझी दया येत नाहीं का; खरेंच सांगतों:—

पद. (चाल-सखे शशिवदने)

प्रिये मृगनयने ॥ तव अधर–ओष्ठगत–अमृत, परम
सुखकारि ॥ ध्रु० ॥ सफल करूं दे पिउनि सखे तें
तें ॥ जन्म तुला हा वाहिन तनुतें ॥अभिनव शशि-
वदनें ॥ प्रिये ॥ १ ॥ (जवळ जातो.)

मोहना—(क्रोधानें) हं खबरदार मूर्खा पुढे येशील तर नीचा अधमा, तुला खचित सांगून ठेवतें:—

पद. (चाल–निर्ल, जाकर.)

जगीं तुझ्या सम कोणि न पापी दुष्टबुद्धि तूं हें

ठरलें॥तूं हें ठरलें॥ यम दूत बहु तुला प्रखर शासनें
छळितिल नीचा अंगबळें॥रे अंग बळें विजन वनीं ॥
धरुनि मनीं ॥ पापवासना छळिशी मजला कटु फल
त्याचें शीघ्रमिळे! ॥ तुज शीघ्र० ॥ १ ॥

कामपाल—(पाया पडून) प्राण सखे, माझा आशाभंग करूं नको, हामी तुला शरण आलों आहें; तर विलंब न लावत माझे मनोरथ पूर्ण कर.

पद. (चाल—बाळा तूं कोठें जाशी०)

कां अशि दुर तूं जाशी येजरा बैस मज पासीं ध्रु॥
सर्वं मम मृदु बोल बोलूनी ॥ सुखवि गे या
लागोनी ॥ पिऊं दे अधरा ॥ ध्रु०॥ संकोच मनिं न
धरिं ॥ तव कांती पाहुन ही तल्लीन मम मन झालें॥
कां अ० ॥;२ ॥

मोहना—

जा दूर दूर चांडाळा ॥ नको स्पर्श करूं रे मजला ॥

काम० पा०—पिऊं दे अधरा संकोच मनिं न धरिं ॥ १ ॥
कां उभी० ॥

कामपाल—अरे! मी हिला इतकें समजावून सांगितलें तरी ही ऐकत नाहीं! बरें तर आतां जरासा नृसिंह अवतार आणल्यासारखें करावें. (जरा जोरानें व जवळ जाऊन.)

पद (चाल त्या निर्लज्जयाचि०)

शहाणी चतुर तूं असुनि असि कां ॥ उगीच अति
कां तूं रडसी ॥ ध्रु० ॥ सोडविण्या तुज कोणि
नये स्थळी ॥ मजविण तरि कां श्रम घेशी ॥
कां श्रम घेसी ॥ उभी राहुनि बोल मसी ॥
बलात्कार करीन तुजवरती ॥ पुरविण्यास मम
हे तूसी ॥ १ ॥

मोहना०—व्यर्थ असा कां मज पिडिसी ॥ सत्यनाश
तव होईल जगती ॥ घे माझ्या या शापासी ॥
॥ २ ॥ शहाणी० ॥

खबरदा मेल्या पुढें येशीलतर! तुझ्या पायाशीं प्राण देईन! हे देवा नारायणा, आतां या नराधमाच्या हातून सोडविणार तुज वांचून कोणिच नाहीं?

हरिणी वृत्तः—

हर हर कशी माझी देवा येहना करुणा तरी ॥
धृ ॥ अश्रमीं नसतां कोणी देवा आला हा आमुचा
अरि ॥ छळितसे मज असाह्य पाहीं दावी तया
प्रचिती ॥ धांव श्रीहरी तूं या वेळीं द्रौपदी परी ॥ १ ॥

कामपाल—थांब इतकावेळ तुझी विनवणी करीत असतां ऐकत नाहींस तर घे आतां तुझ्या कर्मांची फळं (असें ह्मणून तीस धरावयास जातो तोंच चंद्रसेन येऊन त्यास मागें ओढतो)

चंद्रसेन—(आवेशानें)

झंपा

धिःकार! धिःकार! हा क्षात्र तेला ॥ डाग त्वां लाविला
निज कुलाला ॥ धृ० ॥ अधम तव ही कृती पशु सम
मानिती ॥ नाकळे तुज कसें भूपतीला ॥ धिःका० ॥
विफल झालें तुझें जन्म हें नच कळे ॥ रुचतसे पाप
कृति नरपशूला! ॥ धिःकार ० ॥ २ ॥

(कामपाल तरवार सांवरूं लागतो, इतक्यांत चंद्रसेन त्यास क्रोधावेशानें लोटून देतो, व त्याबरोबर तो मूर्च्छित होऊन पडतो.)

(चंद्रसेन व मोहना परस्पर भेटतात.)

मोहना—(उल्हासानें) प्राणनाथा, स्वामीमहाराजांचा आशीर्वाद खरा झालेला पाहून:—

पद. (चाल—धन्य जाहला.)

सुदिन उगवला ॥ नाथा मजसि भेटला ॥ ध्रु० ॥
जगदीशें अह्मां ॥ अगाध ही लीला ॥ दाविली
असे ॥ हरोनि भीतिला ॥ नाथा०॥ दुःख जाहलें
अतिशय मजला ॥ विरहाग्नीनें देह तापला ॥
अमित अतुला लाभ जाहला ॥ हर्षभरें मम कंठ
दाटला ! ॥ नाथा० ॥ १ ॥

चंद्रसेन—प्रिये, दैवापुढें कोणाचा उपाय नाहीं. बरें पण तूं, या अरण्यांत कशी आलीस?

मोहना—प्राण नाथ, त्या दुष्टानें आपणास एकाएकीं पकडून नेल्यावरः—

पद. (चाल—यादवराया भाईयार०)

दुःखभरानें व्याकुळ झालें ॥ चैन नसे मज बहु
भ्यालें ॥ अवचित कैसें अरिष्ट आलें; ह्मणुनि
चित्तीं घाबरलें! ॥ध्रु० ॥ कामपाल नृपतीनें छळुनी
दुःख भयंकर मज दिधलें ॥ वेषांतर मी करुनी
येथें विपिनांतचि या बहु फिरलें ॥ नानाविध मी
क्लेश भोगिले; देह विनाशोत्सुक झालें ॥ पूर्वज-
न्मिच्या परि सुकृतानें अवचित पद हें मज मिळलें!॥१॥

चंद्रसेन-(गहिंवरून)प्रिये,तर मग तुला पुष्कळच क्लेश भोगावे लागेल. पण त्यांचा परिणाम गोड झालेला पाहून वाटतें कीं,

पद. (चाल—भोगी भूषणा.)

राग—मालकंस.

श्रीहरी दया ॥ सकल दैन्य ने विलया ॥ ध्रु० ॥
दृढनिष्ठा पदकमलीं ॥ जरि मनुजें ठेवियली ॥
करिल काय त्यास कली–काल धरि भया. ॥

श्रीहरी० ॥ १ ॥ अवतारहि बहुविध तो ॥
भक्तसुखास्तव धरितो ॥ शरणागत उद्धरितो ॥
दैन्य हरुनियां ! ॥ श्रीहरी० ॥ २ ॥

मोहना—खरोखर प्राणनाथा, एक परमेश्वराची कृपा असली ह्मणजे कांही कमी पडत नाहीं.

चंद्रसेन—खरेंच प्रिये, या आश्रमांत राहणाऱ्या स्वामी महाराजांच्या कृपेनें आपणास हा असा सुदिन उगवला.
(इतक्यांत धर्मदक्ष प्रधान व धैर्यशील प्रबुद्धि प्रधानासह प्रवेश करितात.)

धर्मदक्ष व धैर्यशील—(चंद्रसेनास वंदन करून) महाराजांचा जयजयकार असो.

चंद्रसेन—मित्रा धैर्यशीला, तुझ्या मुखचर्यैवरून पूर्व संकेताप्रमाणें आपला कार्यभाग झाला असावा, असें दिसतें.

धैर्यशील—(हात जोडून) काय विचारावें महाराज? परमेश्वराच्या कृपेनें व आपणासर्वांच्या सुदैवानें आपले सर्व हेतु पूर्ण झाले ओहत. आपली आज्ञा घेऊन स्वराज्यांत परत गेल्यावर प्रधानजीच्या सहायानें शत्रूची सत्ता पार झूगारून दिली, व प्रबुद्धी प्रधानास येथें घेऊन आलों आहोंत.

चंद्रसेन—शाबास धैर्यशीला, उत्तम कीर्ति संपादन केलीस.

प्रबुद्धि—(हात जोडून) महाराज, आपला विनाकारण छळ झालेला पाहून वाईट वाटतें. आह्मी आतां शरण आलों आहोंत.

चंद्रसेन—प्रधानजी, तुह्मांस अभय आहे. (इतक्यांत शूरसेन व धनदास प्रवेश करितात.)

शूरसेन व धनदास—(चंद्रसेनास वंदन करून) महाराजांचा जयजयकार असो.

चंद्रसेन—शूरसेन, तुमचा कार्यभाग कशा रीतीनें सिद्धीस गेला?

शूरसेन—(विनयानें) महाराज. श्री कालिकेच्या मंदिरांत आपला संकेत ठरल्यावर कामपालाच्या राज्यांत जाऊन पाहिलें तों सर्वत्र असंतोष, अन्याय यांमुळें हाहाःकार झालेला दिसला. प्रधानजींनीं फाजील बुद्धीनें व आपमतलबीपणानें सेनापतिस कैदेंत ठेविलें होतें, त्यांस प्रथम मुक्त करून सांप्रत सर्व राज्य हस्तगत करून घेतलें आहे.

चंद्रसेन—आपण सर्वत्रांनीं मिळून उत्तम कार्य केलेंत. (मोहनेकडे पाहून) प्रिये या दुष्ट बुद्धि कामपालाचा आतांच शिरच्छेद करितों.

(इतक्यांत ज्ञानेंद्रस्वामी येऊन त्याचा हात धरतो.)

ज्ञा० स्वा०—हांहां चंद्रसेना, शांत हो शांत हो बाळा, तूं धन्य आहेस तूं या सर्व पृथ्वीवर चांगलीच कीर्ति संपादन केलीस. (ज्ञानेंद्रस्वामीस सर्वत्र नमस्कार करितात.)

शूरसेन—अरे. ए ! घातक्या त्या महा साध्वीस व त्या सत्पुरुषास साष्टांग नमस्कार घाल पाहूं !

का० पा०—हे राजा चंद्रसेना आणि हे महापतिव्रते मोहनें मी आपणास असाह्य असें दुःख दिलें त्याचें मला स्मरण होऊन फार लाज वाटत आहे; तरी त्या विषयीं मला क्षमा करावी. (दोघांच्या पायां पडतो.)

ज्ञा० स्वा०—चंद्रसेना, आतां जगांत आणखि काय प्रिय आहे.

चंद्रसेन—स्वामीमहाराज, आपले कृपेनें माझे सर्वत्र हेतु परिपूर्ण झाले; परंतु परमेश्वराजवळ एव्हढेंच मागणें आहे

॥ भरत वाक्य. ॥

पद. (चाल—सुंदर मुख तुंदिलतनु.)

जयजय श्रीहिमनगजारमण शंकरा ॥ सुरमुनिवर सेवितांघ्रि हे परात्परा ॥ ध्रु० ॥ खल दुर्जनसंहारक भुवनसुंदरा ॥ सकल दुरित हरण विभो चंद्रशेखरा ॥ शरणागतवत्सल हे निगममंदिरा ॥ ईशा । आशा । पाशां । निखुनि चिर सुख देईं विषयलुब्ध मूढ या नरां ॥ जय० ॥ १ ॥ मनथनाथ प्रणताभयदायका हरा ॥ व्याघ्रचर्मपरि वेष्टित धृतफणीवरा॥विविधविपद ग्रस्तजनां शीघ्र उद्धरा॥ सदया । न्याया । विलया । विघ्नतती तुजविण नच भूवरती साह्य ईश्वरा ॥ जय० ॥ २ ॥ स्फुर्ति विमल कविजनांस दे कृपाकरा ॥ राष्ट्रोन्नति धर्मोन्नति होउनी हरा ॥ अखिल भरत भूमिताप गरलकंधरा ॥ दावीं ! भावी ! दैवी ! उत्कर्षा पदकमलीं प्रार्थितसों हें परमेश्वरा ! ॥ जय जय ०॥ ३॥

समाप्त.